पुणे, किशोर–वर्ष ५४, अंक ९ वा, सप्टेंबर २०२५ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.54, Issue 9, September, 2025 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

सप्टेंबर २०२५



# गुरुजी

श्रीनिवास मस्के



नसते ती वर्ग खोली
तो रे थवा पाखरांचा
शब्द दाणे भरतो तो
बाप होतो लेकराचा

घालून वंगण चिंध्या
खडखड थांबवितो
लावून ईळा तणाला
रोपात श्वास भरतो

वादळ येते भरून
बेभान होतात वाटा
नाव नेतो काठावर
उसळू दे किती लाटा

नाही शाळेत लेकरे
फिके फिके रंग होती
रांगेत पडती सरी
माती सुगंध भवती

तळपत्या उन्हालाही
देऊ सांगावा प्रेमाचा
जर का हात राहिला
पाठीवर गुरुजीचा

वर्ग खोलीचा मोकळा
श्वास असतो गुरुजी
कुठे कोणत्या व्याख्येत
सांगा बसतो गुरुजी ?

गाभाऱ्यात जळतो तो
एक दिवा खापराचा
वाटतो गुरू असावा
शाळेतील लेकरांचा.

संपर्क : ९२७१००८८९९

# किशोर

सप्टेंबर २०२५, वर्ष ५४ वे, अंक ९ वा,
भाद्रपद-आश्विन, शके १९४७

■ संपादक :
अनुराधा ओक, प्र. संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

■ प्रकाशक :
हेमंत बाबर
प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

■ कार्यकारी संपादक :
किरण केंद्रे

■ निर्मिती अधिकारी :
मनिष निघोट

■ वितरण व्यवस्थापक :
जी. आर. पानसरे

■ मुखपृष्ठ : किल्ले प्रतापगड
सी. आर. शेलारे ❊ संपर्क : ९४२३०३००६२

■ चित्रांकन :
घनश्याम देशमुख, रेश्मा बर्वे, राजेंद्र गिरधारी,
अजय विभुते, योगिता धोटे, लोकेश कुलकर्णी,
राहुल पोतदार, विनोद गायकवाड,
माईंडईट संवाद, सी. आर. शेलारे

■ अक्षरजुळणी : किशोर विभाग

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

■ ऑनलाईन वर्गणीकरिता :
www.kishor.ebalbharati.in

**पत्रव्यवहाराचा पत्ता:**
कार्यकारी संपादक, किशोर,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४
संपादकीय : ०२०- २५७१६१०७
वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in


# अंतरंग


०२ गुरुजी — श्रीनिवास मस्के
०६ किल्ल्यांच्या हेरिटेजची गोष्ट — प्रा. गणेश राऊत
१० शिवसृष्टी : शिवकाळाची अद्‍भुत सफर — विलास कोळी
१३ गवतफुले — जया नेरे
१४ चिंटू अस्वल आणि त्याचे घर — रवींद्र जवादे
१७ चला चित्र रंगवूया — रेश्मा बर्वे
१८ पाठपुरावा — सुहास बारटक्के
२० AI आणि क्रिडाक्षेत्र — अच्युत गोडबोले


## अभिजात मराठी विभाग


२२ चला, भाषेच्या रुचकर स्वयंपाकघरात — प्रवीण दवणे
२४ शब्दांच्या खाणाखुणा — डॉ. नीलिमा गुंडी
२६ गंमत शब्दांची — प्रा. विश्वास वसेकर
२७ प्रश्नमंजुषा — उदय कदम
२८ चंद्रावरील स्वारीची तयारी — करिश्मा इनामदार, अनुवाद : डॉ.नितीन हांडे
३३ एका अंतराळवीराचे शुभ आगमन — लीना बोकील, अनुवाद : स्वप्नाली अमृतकर
३६ विचारांची जादू — स्नेहल बाकरे
३८ कुतूहल — वसुंधरा भोपळे


## बालविभाग


४० भावी आधारस्तंभ
४२ उमलती प्रतिभा
४४ चित्रकथा : जादूगाराची सुटका — घनश्याम देशमुख
४६ अंगण ते आकाश — सतीश लोथे


## English Section


४७ The Power of Imagination — Dr. Saurabh Jadhav
४८ The Great Adventure — Umeshankar Devadhe
५० Funny Puzzle

## माझे किशोर मासिक

या सुट्यांमध्ये मला एक नवा मित्र मिळाला. त्याचे नाव आहे– 'किशोर'. किशोर हे एक सुंदर मासिक आहे. आरिफ बेग सर यांनी आम्हांला 'किशोर' मासिकाविषयी माहिती दिली. ते आमच्या केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे आम्हांला 'संगीत' विषय शिकवतात.

माझ्या वडलांनी केवळ ८० रुपये वार्षिक वर्गणी भरून किशोरला घरी बोलावले आहे पोस्टाने !

'किशोर' मध्ये खूप काही शिकण्यासारखे आहे. जसे की, गोष्टी, पर्यावरणाबद्दल गोष्टी, इतिहासाबद्दल माहिती, मैदानावरचे खेळ, ओळखा पाहू कोण, थोर माणसांच्या गोष्टी, अशा छान–छान बाबी आहेत. त्याचबरोबर लहान मुलांची मने रमतील अशी बालगीते व चित्रकथाही असतात.

'किशोर' मासिक वाचल्यानंतर खूप छान छान गोष्टींचा अभ्यास झाला. मला हे मासिक खूप आवडले आहे. दर महिन्याला किशोर नवीन रुपडे धारण करून येतो. आता माझी आणि किशोरची घट्ट मैत्री जमली आहे.

**निनाद सोनवणे**
इ.५ वी, केंद्रीय विद्यालय, नाशिक रोड, कॅम्प–४२२१०२

माझ्या घरी 'किशोर' मासिकाचे अंक नियमित येतात. माझ्या मुलाला मराठी भाषेविषयी आपुलकी निर्माण व्हावी व मराठी वाचनाचा आनंद मिळावा यासाठी मी किशोर मासिकाचा अंक चालू केला आहे. हा अंक अतिशय सुंदर आहे. यामध्ये लहान मुलांसाठी बाल विभाग, इंग्रजी विभाग दिलेला आहे. लहान मुलांना मराठी भाषेचं आकर्षण निर्माण व्हावं अशा पद्धतीचे 'किशोर' मासिक आहे. शाळेतील मुलांनी नियमित 'किशोर' मासिक वाचन केले तर नक्कीच माय मराठी भाषेचा गोडवा मुलांमध्ये निर्माण होईल. या अंकातील कथा, बालकविता, मराठी शब्दकोडे, इंग्रजी शब्दकोडे मुलांना आकर्षित करतात. त्यांना वाचनाची गोडी लावतात. मी पेशाने शिक्षक आहे तरी स्वतः एक विद्यार्थी समजून नियमित 'किशोर' मासिक वाचतो. या मासिकामुळे मला मराठी भाषेचे अनेक पैलू नव्याने समजले. वाचनाने आनंद मिळतो. यातून  नवनवीन ज्ञान मला प्राप्त होते. नवीन गोष्टींचा, नवीन शब्दांचा संग्रह माझ्याकडे निर्माण होतो. यापुढेही मी नियमित 'किशोर' मासिक वाचतच राहणार व मराठीचा गोडवा चाखतच राहणार. सर्व विद्यार्थी, शिक्षक यांनीही नियमित 'किशोर' मासिकाचे वाचन करावे असे मी सर्वांना नम्र आवाहन करतो.

**राजेंद्र प्रल्हाद शेळके (शिक्षक)**
जि.प.प्रा.शा. धांडेगाव, केंद्र सावरगाव हडप, ता.जालना,
जि.जालना – ४३१२१३

# गुरू तशी शिष्या...

हितगुज

जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे राष्ट्रगीत वाजणे ही एक मोठी गोष्ट आहे. मला वाटते की, यापेक्षा मोठी दुसरी काही प्रेरणा असूच शकत नाही.

ही गोष्ट आहे भारतीय क्रीडा क्षेत्रातील प्रसिद्ध बॅडमिंटन गुरू आणि त्याच्या शिष्यांची. स्वतःच्या स्वप्नाचा, ध्येयाचा पाठलाग करत असताना आपल्यात जागृत झालेली ज्वाला आपल्या शिष्याला देणारा गुरू आणि गुरूकडून मिळालेली ज्वाला आपल्या मशालीत तेवत ठेवून तिच्या प्रकाशात आपल्या देशाचे आणि गुरुचे नाव उज्ज्वल करणारे शिष्य. गुरूचे नाव पुलेला गोपीचंद आणि शिष्यांचे नाव सायना नेहवाल, पुसरला वेंकट सिंधू, पारुपल्ली कश्यप, के. श्रीकांत आदी. यातील गुरू गोपीचंद आणि त्यांची शिष्या पी.व्ही. सिंधू यांची गोष्ट तर फारच स्फूर्तीदायक आहे. तर विद्यार्थी मित्रमैत्रिणींनो! झाले असे की.. लहानपणापासूनच पुलेला गोपीचंद कष्टाळू आणि जिद्दी होता. तो सहजासहजी हार मानायचा नाही. शाळेच्या काळात गोपीचंदला क्रिकेटची प्रचंड होती. क्रिकेटर व्हायचे त्याचे स्वप्न होते. पण क्रिकेटशिवाय गोपीचंद बॅडमिंटनही चांगला खेळायचा. त्याचा खेळ पाहून एक दिवस त्याचा मोठा भाऊ त्याला म्हणाला , ''क्रिकेटच्या गर्दीत तू हरवून जाशील, पण बॅडमिंटन तुला तुझी ओळख मिळवून देईल.'' अशा प्रकारे गोपीचंदचा बॅडमिंटनचा प्रवास सरू झाला. घरची कडक शिस्त आणि वेळेत झोपण्याच्या सवयीमुळे गोपी सकाळी ५:३० वाजता बॅडमिंटन कोर्टवर पोहोचणारा पहिला खेळाडू असायचा. आर्थिक परिस्थितीमुळे गोपीला खेळण्यासाठी पुरेसे शटलकॉक मिळणे कठीण जायचे. शटल खराब होऊ नये म्हणून अनेकदा त्याला त्याचे आवडते जंप स्मॅश मारणे नियंत्रित करावे लागायचे किंवा कमी करावे लागायचे. त्याची आई बसचा वापर टाळायची आणि पायी चालत जायची, जेणेकरून तिच्या मुलाला शटल कॉक खरेदी करण्यासाठी लागणारे पैसे वाचवता येतील. त्या पैशातून त्यांनी गोपीला बॅडमिंटकरिता आवश्यक असलेल्या किट, शटलकॉक्स आणि त्याच्या प्रवासासाठी खर्च केला. १९९४ मध्ये बॅडमिंटनचा दुहेरी सामना खेळताना गोपीच्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली. तीसहून अधिक टाके पडले. उपचारासाठी खूप खर्च आला. आईने डॉक्टर डॉ. राजगोपाल यांना आपल्या आर्थिक अडचणींची कल्पना दिली तेव्हा या उदार डॉक्टरने लगेचच पैसे घेण्यास नकार दिला आणि गोपीने देशासाठी ऑल इंग्लंड बॅडमिंटन जेतेपद मिळाल्यानंतर त्यांची फी जरूर द्यावी असे सांगितले. २००१ मध्ये अवघड दुखापतीमधून बाहेर पडून; इतिहास रचत गोपीने 'ऑल इंग्लंड बॅडमिंटन' चॅम्पियनशिप जणू एकतर्फीच जिंकली. गोपीने अखेर डॉक्टरांना त्यांची फी दिली.

या स्पर्धेनंतर गोपीचंद हैद्राबादला त्यांच्या घरी परतले तेव्हा त्यांची जंगी विजयी मिरवणूक काढण्यात आली. त्याच वेळी सिकंदराबाद येथील ६ वर्षांची एक मुलगी टीव्हीवर ही मिरवणूक आनंदाने पाहत होती. या मुलीच्या आईने गोपीचंद यांच्या विजयाची प्रेरणादायी कहाणी आपल्या मुलीला सांगितली... आणि या अवघ्या ६ वर्षांच्या चिमुरडीने त्याच वेळी ठरवले की, आपण बॅडमिंटन खेळात पुलेला गोपीचंद यांच्यासारखेच यश मिळवून आपल्या देशाचे नाव उज्ज्वल करायचे. या चिमुरडीचे नाव पी.व्ही.सिंधू. अगदी दहाव्या वर्षापासून तिने गोपीचंद यांच्याकडे प्रशिक्षण घेणे सुरू केले. त्याकरिता ती आपल्या वडलांबरोबर सिकंदराबादमधील मरेडपल्ली ते हैदराबादमधील गचीबाऊली हा त्या वेळचा २ तासांचा प्रवास करायची. म्हणजे दिवसभरात जाऊन येऊन साधारण चार तास केवळ प्रवासात जायचे. पण, सिंधूने प्रवासाच्या या वेळा काटेकोर पाळून वेळेवर सरावाला येण्याचा दंडक कायम ठेवला. दररोज पहाटे ४.३० वाजता सिंधूचा सराव सुरू व्हायचा. गोपीचंद स्वतः पहाटे ४.१५ वाजता बॅडमिंटन कोर्टवर हजर असायचे. सर्दी असो वा ताप, त्यांनी कधीही सराव चुकवला नाही; आणि सिंधूनेही दांडी मारली नाही. पी.व्ही. सिंधू रिओ २०१६ मध्ये तिच्या ऑलिंपिक पदार्पणात रौप्य पदक तर २०२० च्या टोकियो ऑलिंपिकमध्ये कांस्य पदक जिंकून दोन ऑलिंपिक पदके जिंकणारी आणि इतिहास घडवणारी पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली. अशी ही शिक्षक विद्यार्थ्यांची आदर्श गोष्ट. तुम्हीदेखील यातून प्रेरणा घ्या. तुमच्या सर्व शिक्षकांना शिक्षक दिवसाच्या खूप शुभेच्छा.



**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**

# किल्ल्यांच्या हेरिटेजची गोष्ट

प्रा. गणेश राऊत



प्रतापगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या शाळेत सकाळपासून वेगळीच धांदल उडाली होती. इतिहासाच्या सरांनी सकाळी सकाळी शाळा गाठली. सहकाऱ्यांच्या मदतीने शाळेच्या प्रवेशद्वारावर तोरण बांधले. दारात प्रतापगड किल्ला आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व रेखाटणारी रांगोळी काढली. शाळेत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातावर साखर देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी वर्गात प्रवेश केल्यावर इतिहासाचा तास सुरू झाला. सरांचा आनंदी चेहरा पाहून विद्यार्थ्यांनी विचारले, ''अहो सर, आज तुम्ही एवढे आनंदी कसे?'' सर म्हणाले, ''कालचा दिवस आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस होय. काल युनेस्कोने महाराष्ट्रातील ११ आणि तमिळनाडूतील १ अशा १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ असा दर्जा दिला आहे! या किल्ल्यांचा 'अद्वितीय वैश्विक मूल्य' या निकषावर त्या यादीत समावेश केला आहे.''

मध्येच गणू म्हणाला, ''मग सर, आजच्या तासाला त्या बारा किल्ल्यांचीच माहिती सांगा ना.'' गणूच्या प्रश्नावर सगळ्या वर्गाने होकार भरला.

सरांचाही उत्साह दुणावला. सर नेहमीप्रमाणे इतिहास काळात गेले आणि सांगू लागले. ''शिवनेरी, राजगड, रायगड, प्रतापगड, पन्हाळा, साल्हेर, लोहगड, खांदेरी, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि जिंजी या किल्ल्यांचा 'जागतिक वारसा' नामांकन यादीत समावेश झाला आहे. आपल्या गौरवशाली इतिहासाची जागतिक स्तरावर घेतलेली नोंद ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. आपल्या राज्य सरकारने 'भारताचे मराठा साम्राज्यातील लष्करी बांधणीचे गडकिल्ले' हा प्रस्ताव भारत सरकारकडे पाठवला होता. भारत सरकारने हा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठवला. या किल्ल्यांचे युद्धशास्त्रीय महत्त्व, गडाचे आणि गडावरील बांधकाम यांची रचना, गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीत किल्ल्यांना असणारे महत्त्व यामुळे आपल्याला हा सन्मान मिळाला.'' एवढे बोलून सरांनी वर्गावर एक नजर फिरवली. सारेच विद्यार्थी शांतपणे ऐकत होते.

सरांची वाक्गंगा पुढे वाहू लागली. एवढ्यात सईने हात वर केला. ती म्हणाली, ''सर, या सगळ्याचा फायदा काय?'' सर म्हणाले, ''सई, जागतिक दर्जा मिळाल्याने ते ठिकाण जगाच्या नकाशावर पोहोचले. त्यामुळे त्या ठिकाणच्या पर्यटनास प्रोत्साहन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. स्थळाचे जतन, संरक्षण, संवर्धन सोपे होते. लोकसहभाग वाढतो. असे कितीतरी फायदे होतात.''

एवढ्यात घंटा झाली. सर म्हणाले, ''जाता-जाता गृहपाठ सांगतो. वर्गात ४८ मुलंमुली आहेत. दोन मुले - दोन मुली असे १२ गट पाडून सांघिक काम म्हणून प्रत्येक किल्ल्याचे एक वैशिष्ट्य एक-दोन ओळींत या सर्व गटांनी लिहून आणायचे. सर्वोत्तम लेखनास बक्षीस.'' एवढे बोलून सर बाहेर पडले.

शाळा सुटली. आपल्याच गटाचा प्रथम क्रमांक यावा म्हणून सर्वांनी भवानीमातेस साकडे घातले. दुसऱ्या दिवशी मुलामुलींनी गट पाडून सादरीकरण केले.

**बबन** - आमचा शिवनेरी किल्ला... शिवछत्रपतींचे जन्मस्थान आणि शिवाईदेवीचे स्थान यामुळे अजरामर आहे.

**शुभ्रा** - शिवछत्रपतींची पहिली राजधानी आणि तीन अद्वितीय माच्या असणारा राजगड सर्वश्रेष्ठ आहे.

**संजय** - लोहासारखा भक्कम आणि विंचूकाटा या दुर्गम माचीमुळे भरभक्कम असा एकमेव दुर्ग म्हणजे लोहगड.

**सई** - शिवछत्रपतींचा राज्याभिषेक झालेला किल्ला आणि परकीय राजदूतांनीही भेट दिलेल्या या रायगडाला पर्याय नाही.



**सगन** – जगात भारी कोल्हापुरी अशी वास्तू म्हणजे पन्हाळगड. मराठ्यांच्या स्वातंत्र्यसंग्रामातील स्वराज्याची राजधानी.

**उषा** – मध्ययुगात वाघनखे हे हत्यार वापरले गेलेला एकमेव किल्ला म्हणजे प्रतापगड. असे पूर्वी कधी झाले नाही आणि भविष्यात होणार नाही.

**मगन** – महाराष्ट्रातील सर्वोच्च गडमाथा अशी माझ्या साल्हेर किल्ल्याची ख्याती.

**माई** – मराठ्यांनी आरमारी युद्धात इंग्रजांचा पराभव केला तो खांदेरीचा किल्ला.

**वरद** – तटबंदीच्या पायात शिसे ओतण्याचा एकमेव प्रयोग केलेला किल्ला आणि मला ब्रिटिश वगळता कोणी जिंकू शकले नाही, असा अभेद्य सिंधुदुर्ग.

**जुई** – घेरियाचे नामकरण झाले विजयदुर्ग आणि माझ्या परिसरात झाला सूर्यग्रहणाचा अभ्यास.

**नंदन** – शिवाजीरायांनी बांधले मला आणि कान्होजींनी सांभाळले असा सुवर्णदुर्ग, याला तुलनाच नाही.

**जाई** – शिवकाळातील तिसरी राजधानी आणि

राजगिरी, कृष्णगिरी व चंद्रयानदुर्ग यांचे एकत्रित स्वरूप म्हणजे जिंजीचा किल्ला.

सर्व गटांचे सादरीकरण झाल्यावर वर्गात टाळ्यांचा कडकडाट झाला. सर्वोत्तम कोण? या निकालाकडे सर्वांचे लक्ष होते. सर म्हणाले, ''सर्वोत्तम बक्षीस...''

सगळ्यांचे कान टवकारले गेले. सरांनी मोठा पॉझ घेतला. विद्यार्थी आतुर झाले. सर म्हणाले, ''सर्वोत्तम क्रमांक १२ गटांत विभागला आहे. तुम्हां सर्वांना ख्यातनाम इतिहासकार ग. ह. खरे लिखित 'सिंहगड' हे पुस्तक बक्षीस देण्यात येत आहे. मी त्याच्या ५० प्रती आणल्या आहेत. हे पुस्तक तुम्हीच वाचा. कारण आता हे पुस्तकदेखील दुर्मीळ झाले आहे.''

**संपर्क** : ८४५९७७२०१

## * युनेस्को (UNESCO) जागतिक वारसा निकष *

(१) मानवी सर्जनशील प्रतिभेच्या कलाकृतीचे प्रतिनिधित्व करणे;

(२) जगातील एखाद्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये किंवा कालखंडामध्ये वास्तुकला, तंत्रज्ञान, स्मारकीय कला, नगर नियोजन किंवा भू-रचनेच्या विकासावर मानवी मूल्यांचे महत्त्वपूर्ण आदान-प्रदान दर्शवणे;

(३) जिवंत असलेल्या किंवा नष्ट झालेल्या सांस्कृतिक परंपरेची किंवा सभ्यतेची अनोखी किंवा किमान अपवादात्मक साक्ष देणे;

(४) मानवी इतिहासातील महत्त्वपूर्ण टप्प्याचे/टप्प्यांचे वर्णन करणाऱ्या इमारती, वास्तुशास्त्रीय किंवा तांत्रिक संकुल किंवा लँडस्केपच्या प्रकाराचे उत्कृष्ट उदाहरण असणे;

(५) संस्कृतीचे (संस्कृतींचे) प्रतिनिधित्व करणाऱ्या किंवा विशेषतः अपरिवर्तनीय बदलाच्या प्रभावाखाली असुरक्षित झालेल्या पर्यावरणाशी मानवी संवादाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पारंपरिक मानवी वसाहती, भूमी-वापर किंवा समुद्र-वापराचे उत्कृष्ट उदाहरण असणे;

(६) घटना किंवा जिवंत परंपरा, कल्पना किंवा श्रद्धा, उत्कृष्ट वैश्विक महत्त्व असलेल्या कलात्मक आणि साहित्यिक कृतींशी प्रत्यक्ष किंवा मूर्त संबंध असणे. (समिती मानते की, हा निकष प्राधान्याने इतर निकषांसोबत वापरला जावा);

(७) अत्युत्कृष्ट नैसर्गिक घटना किंवा अपवादात्मक नैसर्गिक सौंदर्य आणि सौंदर्यशास्त्रीय महत्त्व असलेले क्षेत्र समाविष्ट असणे;

(८) जीवनाचा अभिलेख, भूस्वरूपांच्या विकासातील महत्त्वपूर्ण चालू भूवैज्ञानिक प्रक्रिया किंवा महत्त्वपूर्ण भू-आकृती शास्त्रीय किंवा भौगोलिक वैशिष्ट्यांसह पृथ्वीच्या इतिहासातील प्रमुख टप्प्यांचे प्रतिनिधित्व करणारी उत्कृष्ट उदाहरणे असणे;

(९) स्थलीय, गोडे पाणी, किनारी आणि सागरी परिसंस्था आणि वनस्पती व प्राण्यांच्या समुदायांच्या उत्क्रांती आणि विकासातील महत्त्वपूर्ण चालू परिस्थितिकी आणि जैविक प्रक्रियांचे प्रतिनिधित्व करणारी उत्कृष्ट उदाहरणे असणे;

(१०) विज्ञान किंवा संवर्धनाच्या दृष्टिकोनातून उत्कृष्ट वैश्विक मूल्य असलेला; धोक्यात असलेल्या प्रजातींसह जैवविविधतेच्या स्वस्थानी संवर्धनासाठी सर्वात महत्त्वपूर्ण नैसर्गिक अधिवास समाविष्ट असणे.



# शिवसृष्टी : शिवकालाची अद्भुत सफर

विलास कोळी

**शिवसृष्टी थीम पार्क :**

छोट्या दोस्तांनो, बालगोपाळांनो, तुम्ही इतिहासाच्या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वाचलं असेल, तुम्हांला महाराजांचा युद्धातील पराक्रम, राज्याभिषेकाचा थाटमाट डोळ्यांनी पाहायचाय का? तुम्हांला छत्रपती शिवाजी महाराजांचे भाषण ऐकायचे आहे का? उंच आकाशातून खाली रायगड पहायचाय का? हे स्वप्न आता पुरं होऊ शकतं... कारण पुण्यात उभं राहिलंय एक अद्भुत, झगमगणारं आणि इतिहास शिकवणारं ठिकाण म्हणजे शिवसृष्टी ऐतिहासिक थीम पार्क!

ही कल्पना होती पद्मविभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची! त्यांनी आयुष्यभर छत्रपतींचा इतिहास लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. त्यांना वाटायचे, महाराजांची गोष्ट ही फक्त पुस्तकात नाही, तर डोळ्यांनी पाहायला मिळाली पाहिजे! त्या वस्तूंना/वास्तूंना स्पर्श करता आला पाहिजे, म्हणूनच त्यांनी स्वप्न पाहिले की एक अशी शिवसृष्टी उभारायची, जिथं इतिहास जिवंत होईल, आणि प्रत्येक माणूस स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात असल्याचा अनुभव घेईल.

हे स्वप्न पूर्ण करायला त्यांनी कितीतरी वर्षं मेहनत घेतली. आता या शिवसृष्टीच्या चार टप्प्यांपैकी दोन टप्पे पूर्ण झाले आहेत, आणि या दोन टप्प्यांत तुम्हांला खालील काही महत्त्वाच्या गोष्टी पाहायला मिळतील.




**दुर्ग वैभव दालन :**

तुम्ही कधी रायगड, प्रतापगड, तोरणा, सिंधुदुर्ग यांसारखे ऐतिहासिक किल्ले प्रत्यक्ष पाहिले आहेत का? जर नसतील पाहिले, तरी काळजी करू नका कारण शिवसृष्टीमध्ये आहे एक अनोखं दालन, दुर्ग वैभव दालन...

या दालनात तुम्हांला हे सारे किल्ले पाहायला मिळतील. अगदी त्यांच्या मूळ रूपात! मोठ्या एलईडी स्क्रीनवर त्या किल्ल्यांचे शूटिंग दाखवले जाते, प्रोजेक्टरच्या सहाय्याने ते आपल्या समोर साकार होतात, त्यामुळे आपल्याला असं वाटतं की आपण प्रत्यक्ष गडावर उभे आहोत.

ज्यांनी हे किल्ले पाहिले आहेत, त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळतो, आणि ज्यांनी पाहिलेच नाही, त्यांना तो अनुभव जसा आहे तसा घेता येतो.

**श्रीमंत योगी दालन :**

या शिवसृष्टीमध्ये एक आगळीवेगळी अनुभूती देणारे दालन म्हणजे श्रीमंत योगी दालन. इथे छत्रपती शिवाजी महाराज प्रत्यक्ष तुमच्याशी संवाद साधतात. अगदी त्यांच्या अस्सल भाषेत, त्यांच्या आवाजात! ही एक अद्भुत, आधुनिक तंत्रज्ञानाने घडवलेली सजीव भेट वाटते. महाराजांचे विचार, तत्त्वज्ञान आणि दूरदृष्टी जेव्हा त्यांच्या तोंडून ऐकायला मिळते, तेव्हा इतिहासच जणू आपल्यासमोर उभा राहतो. डोळे, कान आणि मन तिन्ही अनुभवांनी भारावून जातात. हा क्षण प्रेरणा देतो, गर्व निर्माण करतो आणि छत्रपतींच्या कार्याची जाणीव अधिक प्रेरक करतो.



**आग्र्याहून सुटका :**

छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याच्या किल्ल्यात बंदिवासात असताना तेथील कडेकोट पहाऱ्यातून सुटका करायची म्हणजे जणू अशक्यप्राय गोष्ट! पण महाराज तर थोर योद्धा आणि अफलातून मुत्सद्दी होते. त्यांनी अगदी शिताफीने तेथून स्वतःची आणि इतरांची सुटका केली.

हे सगळं तुम्ही पाहू शकता परकालदास या पात्राच्या नजरेतून. तो त्या काळातील आग्रा दरबारी होता, आणि सर्व प्रसंग त्याने त्याच्या डोळ्यांनी पाहिले होते. त्याच्या कथनातून सगळा तत्कालीन इतिहास जिवंत होतो. अगदी तो आपल्या डोळ्यांदेखत घडतोय, असं वाटतं.

**राज्याभिषेक दालन :**

इथे फक्त इतिहास केवळ पाहायला नाही मिळत, तर तो अनुभवता येतो. शिवराज्याभिषेकाचा तो सोहळा, जणू तुमच्याच डोळ्यांसमोर घडतोय असं वाटतं. या दालनात इंग्रज प्रवासी हेन्री ओक्झेडन (Henry Oxenden) याने लिहिलेली



राज्याभिषेक सोहळ्याची डायरीसुद्‌धा पाहायला मिळते. एका बाजूला त्याचे मूळ इंग्रजी लेखन आणि दुसऱ्या बाजूला त्याचे मराठी भाषांतर, जे पाहताना इतिहासाचा जणू साक्षात्कारच होतो. तसेच महाराजांची राजसत्ता दाखवणारी चिन्हंदेखील यावेळी पाहायला मिळतात.

**शस्त्र प्रदर्शन दालन :**

या दालनात मराठ्यांच्या शौर्याचा साक्षात वारसा अनुभवता येतो. इथे पारंपरिक प्राचीन शस्त्रं जसे की, तलवार, ढाल, भाले, दांडपट्टा, तोफ, चिलखत आणि इतर युद्‌धसामग्री यांचे मूळ स्वरूप पाहायला मिळते.

**शत्रूची गॅलरी :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात अनेक आव्हानं होती. त्या काळात अनेक सरदार, सुभेदार, मुघल व आदिलशाही सेनापती महाराजांच्या विरोधात उभे होते. या गॅलरीमध्ये त्या सर्वांची माहिती हाय-रिझोल्यूशन पोर्ट्रेट्समधून उलगडली जाते.

**दुसरा टप्प्या...**

**टाइम मशीन :**

येथील एक भन्नाट गोष्ट म्हणजे टाइम मशीन! इथे एक गोल फिरणारे प्रेक्षागृह आहे. ३६° अंशातून, जिथे १०० लोक बसून ३६ मिनिटांत हजार वर्षांचा इतिहास पाहू शकतात. आपण एका जागेवर बसलेलो असतो, पण आपल्यासमोर संपूर्ण इतिहास फिरतो. जण काळकुपीतून भूतकाळ सफर!

त्यानंतर गडकिल्ल्याच्या तटबंदीमधून रायगडचा गोमुखी दरवाजा, गंगासागर तलाव, घाट, आणि भवानी माता मंदिरही पाहायला मिळतं. हे बघून समजतं की महाराजांचे किल्ले फक्त किल्ले नव्हते; तर ते महाराजांचे संपूर्ण स्वराज्याचे केंद्र होते!

शिवसृष्टी म्हणजे केवळ इतिहास नव्हे, तो जिवंत इतिहास आहे. जो इथे तुम्ही पाहता, ऐकता, अनुभवता, आणि जिंकता. पद्‌मविभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी पाहिलेले हे स्वप्न आता प्रत्येकाच्या डोळ्यांत उतरू लागले आहे.

मित्रांनो, जेव्हा तुम्ही शिवसृष्टीला याल, तेव्हा लक्षात ठेवा, ही फक्त सहल नाही, हे आहे प्रेरणेचे, संस्काराचे आणि अभ्यासाचे केंद्र.

**संपर्क :** ९७६३०८४४९९

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक हेमंत बाबर यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नं. १ ते १०, ई-१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्‌ध केले. ✻ संपादक - अनुराधा ओक.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Hemant Baber, Printed at M/s. Printplus Private Limited, G1 to G10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka-Bhiwandi, Dist-Thane 421311 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004.**
*** Editor - Anuradha Oak.**

# गवत फुले

जया नेरे

इवल्या इवल्या गवत फुलांची गाणी
असते त्यांची मंजूळ वाणी
वाऱ्यासंगे रंगत गप्पागोष्टी
जणू सांगती आपुली कर्मकहाणी

हिरवी पिवळी लाल जांभळी दिसली
प्रत्येकाच्या मनात होती ठसली
पांघरली जणू नानारंगी वस्त्रे
त्यावर नक्षी सुंदर होती सजली

हिरवी नाजूक सळसळणारी पाती
त्यावर खुलले दवबिंदूंचे मोती
एकाकी पण आनंदाने जगली
जपली त्यांनी हृदयामधली नाती

पराग पिवळे फुलातले झगमगती
येऊन पक्षी तिथेच मग बागडती
रविकिरणांनी घास भरविता त्यांना
दुःखे त्यांची क्षणात विरून जाती

फुलाफुलांची भरली होती शाळा
ती आनंदाने झाली होती गोळा
तहानली जर खेळ खेळून कोणी
उंच होऊनी खुणावती आभाळा

संपर्क : ९४२३९१८३६३



रवींद्र जवादे




# चिंटू अस्वल आणि त्याचे घर

सकाळ झाली. चिंटू अस्वल उठलं. गार वारा सुटला होता. झाडावर पाखरं किलबिलत होती. चिंटूनं स्वतःभोवती एक छानशी गिरकी घेतली. तोंडातून सुंदर शीळ फुंकली. त्याला आज खूपच प्रसन्न वाटत होतं. त्याचं कारणही तसंच होतं. आज चिंटू त्याच्यासाठी एक छानसं घर बांधायला सुरुवात करणार होता. चिंटू झुडपाजवळ गेला. तिथं ठेवलेलं मधाचं पोळं त्यानं काढलं. मस्तपैकी त्यातलं मध खाल्लं. मध गोड गोड होतं. चिंटूला खूप मजा आली.

चिंटू नुकताच इथं राहायला आला होता. पूर्वी तो दाट जंगलात राहायचा. या जंगलात खूप खूप झाडे होती. पशुपक्षी होते. सुंदर सुंदर ससे, उड्या मारणारी हरणं, धूम पळणारे रानगवे, चितळं आणि हो, वाघपण होता. चिंटूचं मन तिथे रमलं होतं. त्याला छानसे मित्रही मिळाले होते. छुटकू नावाचे एक लाजाळूसे ससोबा आणि मयंक नावाचं एक हुशार हरीण हे चिंटूचे खास मित्र होते. चिंटूचं आणि त्या दोघांचं खूप पटायचं. तिघे मिळून भारीच मजा करायचे. दिवस आनंदात जात होते. चिंटू शिकार करायचा, भरपूर खायचा. लहर आली की, मित्रांसोबत खेळायला जायचा, नाहीतर छान झुडपात बसून आराम करायचा. पण एक दिवस मात्र विपरीत घडलं. जंगलात एक जोराचं वादळ आलं. झाडे-वेली गदागदा हलू लागली. काही मोठीमोठी झाडं मानेतून मोडून पडली. पक्षी अचानक आलेल्या संकटानं घाबरून गेले. प्राणी निवारा शोधण्यासाठी सैरावैरा पळू लागले. वाघही मोठमोठ्याने डरकाळी फोडू लागला.

जंगलात हाहाकार माजला. ज्यांची घरं होती, ते त्या घरात सुरक्षित होते. पण चिंटूचं काय? त्याला तर घरच नव्हतं.

चिंटू ज्या झुडपात राहायचा, ते जोरानं आलेल्या वाऱ्यात उडून गेलं. चिंटू घाबरला. वारा थांबत नव्हता. वादळही शमलं नव्हतं. चिंटूनं कसाबसा आपला जीव वाचवला. आता काय करावं? कुठे जावं? स्वतःचं घर असतं तर किती बरं झालं असतं. चिंटू मनातल्या मनात विचार करत होता. अचानक त्याला आठवलं, 'ह्या जंगलात आपण एकटे कुठे आहोत? आपले जिवाभावाचे मित्रही आहेत की; छुटकू आणि मयंक. ते घेतील आपल्याला घरात. थांबवतील आग्रहानं!' चिंटू मनातून सुखावला. त्याला आनंद झाला. स्वतःला कसाबसा वाचवत तो धावतच छुटकूच्या घराकडे निघाला. छुटकूचं घर थोडं लांब होतं. छुटकूच्या घरापर्यंत पोहोचता पोहोचता चिंटूला चांगलाच दम लागला. घराच्या दारात उभं राहून चिंटूनं कडी वाजवली. आतून आवाज आला, ''कोण?'' चिंटूनं पुन्हा कडी वाजवली. अरे, ''छुटकू दार उघड. अरे, मी आलोय मी! तुझा मित्र चिंटू.'' छुटकूनं मात्र दार उघडलंच नाही. तो आतूनच ओरडला. ''दारावरची पाटी वाचली नाही वाटतं. ती पाटी वाच आणि चालता हो इथून.'' चिंटू नाराज झाला. त्याला वाईट वाटलं. 'जिवलग मित्र! कशाचा आलाय मित्र?' चिंटू मागे वळला. दारावरच्या पाटीवर लिहिलं होतं, 'बाहेरच्यांना घरात प्रवेश नाही.'

चिंटू खूप थकलेला होता. त्याला भूकही खूप लागली होती. वादळ मात्र थांबलं नव्हतं. कुठेतरी निवारा शोधणं आवश्यक होतं. चिंटू मयंक हरणाकडे निघाला. थकूनभागून मयंकच्या घरापर्यंत पोहचला. तिथेही तशीच परिस्थिती होती. मयंकनं तर साधी मैत्रीची ओळखही दाखवली नव्हती. तो चिंटूला म्हणाला होता,

''मी तुला ओळखतच नाही मुळी. मग आपण मित्र कसे?'' चिंटूला मनोमन वाटलं, 'असे मित्र असण्यापेक्षा मित्र नसलेलेच बरे!' त्या दिवशी चिंटूला मनातून वाटलं, 'खरंच आपलंही एक घर हवं.' वादळ शांत झाल्यावर तडक त्यानं ते जंगल सोडलं आणि ते मित्रही. जे मदत करणं तर दूरच, साधी ओळखही देत नाहीत. चिंटू दूरवर आला होता. नदीजवळच्या शांत जंगलात! इथं छान हिरवंगार, लुसलुशीत गवत होतं. लांब लांब तुरेदार गवतावरून उडणारी रंगीबेरंगी फुलपाखरं होती. उंचशा झाडांवर मधानं भरलेली पोळी होती. चिंटू इथं आनंदी होता. हा! इथं मित्र नव्हते, पण झुडपाजवळच्या उंच झाडावर एक सुंदर पोपट राहायचा, राघू नावाचा. चिंटूची त्याच्याशी छान ओळख झाली होती.

चिंटूनं मागचं सारं विसरायचं ठरवलं. आजचा दिवस छान होता. गवतावर फुले फुलली होती. वारा सुगंधी झाला होता. चिंटूनं झाडावर पाहिलं. झाडावर राघू बसला होता.

''हॅलो राघू! कसं काय? छान?''

राघूनं मस्तपैकी मान हलवली आणि चिंटूसाठी झाडावरची दोन पिकलेली फळं खाली टाकली. चिंटूनं ती मजेत खाल्ली. आता त्याला नवा हुरूप आला होता. चिंटू लगेच घराच्या तयारीला लागला. तो राहायचा त्या झुडपाजवळच एक उंचशी जागा होती. चिंटूनं तिथेच घर बांधायचं ठरवलं. तो आपल्या लांब लांब, अणकुचीदार नखांनी माती उकरत होता. बाजूला मातीचा ढिग साचू लागला होता. जमिनीतली ढोल खोल खोल होत होती. एवढ्यात आतून एक भला मोठा नाग फुत्कारला,

''कोण रे तू? आणि इथे काय करतोस? जवळच माझं बीळ आहे, हे कळत नाही का तुला?'' चिंटूची बोबडी वळली. त्याच्या शरीराला घाम सुटला. चिंटू शक्य तेवढ्या हळू आवाजात म्हणाला, ''मी चिंटू, घर बांधतोय जमिनीत. माफ करा नागमहाराज. मला कल्पनाच नव्हती आपणही इथंच राहता म्हणून.'' ''अच्छा चल. जास्त शहाणा बनू नकोस. बाजूला बनव तुझं घर.'' नाग पुन्हा फुत्कारला.

चिंटूने नागाच्या बिळाकडची जागा सोडून दिली. पुन्हा तो ढोल करण्यात गर्क झाला. चांगली चार-पाच फूट ढोल खोल झाली. चिंटू आता चांगल्या रितीनं ढोलीत शिरत होता. सारखी माती उकरल्यामुळे आजूबाजूला आवाज जात होता. एवढ्यात एक डरकाळी चिंटूच्या कानावर आदळली, ''कोण आहे रे तिकडे? कोण माझ्या शांत झोपेत व्यत्यय आणू पाहतो?'' चिंटूचे हातपाय लटपटू लागले. ''बापरे ! वाघ!'' चिंटू त्याच ढोलीत लपून बसला. काहीच आवाज न आल्याने तिकडे वाघ पुन्हा शांत झोपी गेला होता.

हळूहळू करून चिंटूने काही दिवसांतच आपले




छानसे घर तयार केले होते. तो त्यात आनंदानं राहू लागला होता. आता त्याला कशाचीच चिंता नव्हती. राघू आणि त्याची मैत्रीही गाढ झाली होती. दोघेही एकमेकांना मदत करायचे. कधीकधी नदीपर्यंत सोबत जायचे. छान खेळायचे. चिंटूचं सगळं छान चाललं होतं.

पण तिकडे वरच्या जंगलात जिथे पूर्वी चिंटू राहायचा, त्या जंगलात मात्र कोरडा दुष्काळ पडला होता. सगळं जंगल वाळून गेलं होतं. जंगलात कुठेही पाणी नव्हतं. पशु-पक्षी अन्न, पाण्याशिवाय तडफडून मरत होते. ज्या प्राण्यांच्या शरीरात थोडंसं बळ उरलं होतं, ते जंगल सोडून खालच्या हिरव्यागार जंगलाकडे निघाले होते. पाऊस येण्याची काही चिन्हं दिसत नव्हती. छुटकू ससोबा आणि मयंक हरणाचीही परिस्थिती अतिशय बिकट झाली होती. त्यांचे स्वतःचे आई-वडील, नातेवाईक दुष्काळात मरून पडले होते. शेवटी न राहवून छुटकू आणि मयंकनं ते जंगल सोडण्याचं ठरवलं आणि ते चिंटू राहत असलेल्या जंगलाकडे यायला निघाले. वाटेत त्यांच्या मनान नाना शंका, विचार येत होते. त्या जंगलात आपण अनोळखी... चिंटू आपल्याला ओळखेल काय? मागे आपण त्याच्याशी अतिशय वाईट वागलोय. त्याने ते जर मनात ठेवले असेल तर? मग आपण कुठे जायचे ? पण त्यांना कुठलाही उपाय दिसत नव्हता.

छुटकू ससोबा आणि मयंक हरीण मजल दरमजल करत वाटेत सापडेल ते खात, थोडे थांबून, विश्रांती घेत आणि पुन्हा जंगलाच्या दिशेनं चालू लागत. हळूहळू बरेच दिवस निघून गेले. छुटकू आणि मयंक एकदाचे त्या हिरव्यागार जंगलात पोहोचले. त्यांना फार आनंद झाला. मग त्यांनी चिंटूचे घर शोधले. पाहतात तर काय चिंटूच्याही घरावर पाटी. ते क्षणभर थबकले. पण पाटीवर लिहिलं होतं, 'ह्या घरात सगळ्यांचे मनापासून स्वागत आहे!'

**संपर्क** : ९४२०७०८०२६

## * चला चित्र रंगवूया...!!!

सोनूच्या वर्गातील मुलामुलींनी शिक्षकदिनानिमित्त वर्गात सजावट केली. त्यांच्या आवडत्या शिक्षकांचं चित्र फळ्यावर काढलं. शुभेच्छा संदेश लिहिला. तुम्हीही तुमच्या आवडत्या शिक्षकांचं चित्र काढा, छानसं रंगवा आणि त्यांना जरूर दाखवा.

रेश्मा बर्वे





भाग ९

# पाठपुरावा

सुहास बारटक्के

निवतीच्या खडकांमध्ये असलेल्या गुहेतील पाकोळीची घरटी परदेशात पाठवण्याकरता काही लोक मदत करत असावेत आणि ते वेंगुर्ला तालुक्यातील किंवा मालवणमधीलच असावेत, अशी आता नील व बाबूल टीमची खात्रीच पटली होती. रात्रीच्या वेळी समुद्रकिनारी कोण कोण जातात याचा त्यांनी शोध घ्यायला सुरुवात केली. शाळेतल्या इतर मित्रांशी चर्चा करता त्यांना असं कळलं की, 'शेजारच्या परुळे गावाच्या वेशीवर डोंगराच्या कडेला अलीकडेच एक मोठं पत्र्याचं घर बांधलं असून तिथे दोन अनोळखी माणसं रहातात. जेवणाच्या निमित्तानं ते निवती गावात येतात. मात्र रात्री जेवण झाल्यावर खूप उशीरापर्यंत त्यांची समुद्रकिनाऱ्यावर भटकंती सुरू असते. मासे साठवणूक करण्याचा त्यांचा व्यवसाय असल्याचं ते सांगतात. मात्र त्यांच्या त्या पत्र्याच्या घरात ते कुणालाही प्रवेश करू देत नाहीत. बराच काळ त्यांचं घर बंद असतं. रात्री त्यांची फिरती सुरू असते कधी मालवण तर कधी भोगवे बीचवर. ते कशाचा तरी शोध घेत फिरत असतात.' असेही त्या परिसरातल्या बाबूलच्या मित्रांनी त्यांना सांगितलं. 'आपण निसर्गप्रेमी असून कासव संवर्धन प्रकल्पालाही मदत करतो, असं ते लोकांना सांगत.'

समुद्रावर रात्री-बेरात्री फिरणाऱ्या इतर काही व्यक्तींची चौकशी करण्यात १०-१२ दिवस गेले. अखेर नील व बाबूलनं पत्र्याच्या घरात रहाणाऱ्या त्या दोघांचा माग काढण्याचं ठरवलं. आता दररोज ते मुद्दाम त्या बाजूला सायकली घेऊन फिरायला जाऊ लागले. अखेर एकदा त्यांना ती संधी मिळालीच. त्या घरात काय आहे ते पहाण्याची त्यांची उत्सुकता त्या दिवशी पूर्ण झाली.

त्याचं असं झालं की, एकदा ते दोघे अनोळखी पुरुष फोनवर जोरजोरात बोलत त्या घरातून बाहेर आले. एकानं दार लावून कडी घातली व गडबडीत कुलूप न

लावताच मोटरसायकलवरून मालवणच्या दिशेनं निघून गेले. रस्त्यावरून फिरणाऱ्या बाबूल व नीलच्या टीमनं ते खूप दूरवर गेल्याची खात्री करून मग झाडाखाली सायकली लावून हळूच कडी काढून त्या पत्र्याच्या घरात प्रवेश केला. पण काय आश्चर्य तिथं मासे साठवण्याकरता कोणतीही सामग्री नव्हती! नव्हता वजन काटा की नव्हता फ्रीज. फक्त दोन झोपायच्या कॉटस् होत्या. इतर कपडे टांगलेले होते आणि हो, एक पत्र्याची मोठी ट्रंक मात्र कॉटखाली भलं मोठं कुलूप लावून ठेवलेली होती. त्यात त्यांचे खाद्यपदार्थ व इतर वस्तू वगैरे असणार असं नीलला वाटलं. पण बाबूलच्या नाकाला कसलातरी वास झोंबला. कस्तुरी अगरबत्ती लावावी तसा हा मंद सुगंध होता व तो त्या ट्रंकमधूनच येत होता. मध्येच कुजल्यासारखाही वास येई तर मध्येच सुगंध. त्या पेटीत काय असावं? काही प्राणी वगैरे मारून ठेवला नसेल? माशाचा वास तर नक्की नव्हता कारण बाबूलचं सगळं जीवनच मासेमय होतं.

मग काय असावं बरं? दोघांचीही उत्सुकता ताणली गेली पण ते भलंमोठं कुलूप कसं उघडणार? ती पत्र्याची शेड वजा ते घर नीट तपासून दोघेही बाहेर आले. नीलनं सहज म्हणून दरवाजा मागे पाहिलं तर काय, मागे लावलेल्या लाकडी पट्टीवर एक कुलूप आणि दोन तीन किल्ल्या अडकवून ठेवल्या होत्या. त्या सोबतच मोठमोठे सर्च लाईटसही टांगून ठेवले होते.

'सापडल्या रे किल्ल्या, पाहू या पेटीत काय आहे ते.' नीलनं आनंदानं म्हटलं तसं बाबूल म्हणाला, ''मी बाहेर उभा राहून ते दोघे येतायत का पाहतो. त्यांच्या मोटरसायकलचा आवाज आला की, तुला ओरडून सांगतो. तोपर्यंत या किल्ल्या लावून तू ट्रंक उघडून पहा.'' बाबूलनं सुचवलं. नीलनं त्या सर्व किल्ल्या लावून पाहिल्या तसं एका किल्लीनं त्या पत्र्याच्या पेटीचं-ट्रंकचं झाकण उघडलं. आत प्लॅस्टिक कागद व गोणपाटाचं कापड यामध्ये काहीतरी गुंडाळून ठेवलं होतं. त्याचाच वास येत होता. हात लावून पाहिला तर हाताला काहीतरी चिकट लागलं. नीलला तो वासही सहन होईना. तो तत्काळ उठून बाबूलकडे आला व म्हणाला, ''जा रे, तूच जा आणि बघ काय आहे ते. मला कळत




नाही. मी बाहेर थांबतो तुला इशारा देण्यासाठी.''

बाबूलने आत जाऊन ट्रंकेत पाहिलं. गोणपाटाचं कापड बाजूला केलं तर आत राखाडी रंगाचा लालसर पिवळट असा असलेला मोठा गोळा होता. दोन अडीच किलोचा असेल.

'काय असावं बरं हे?' दोघांनाही काहीच कळेना मग त्यांनी तो गोळा पुन्हा कापडात गुंडाळून जसाच्या तसा ठेवला. ट्रंकेला कुलूप लावलं, बाहेर येऊन दाराला होती तशी कडी लावून ते दोघे घरी परतले. आज नीलचाही मुक्काम बाबूलच्या घरी होता. रात्री समुद्रावर थोडं चांदण्यात फिरून आल्यावर त्यांनी बाबूलच्या बाबांना हळूच विचारलं.

''असा राखाडी कलरचा लांबटगोल आकाराचा मेणासारखा घट्ट परंतु वास येणारा गोळा कसला असतो बाबा?.''

'कशाबद्दल बोलताय तुम्ही? मला काहीच कळत नाही.' बाबा म्हणाले. मग मात्र त्या दोघांना मागे समुद्रावर मध्यरात्री दिसलेले व बोटीतून गेलेले दोघे, त्यानंतर गेले काही दिवस या दोघांनी केलेली चौकशी, आणि आज त्या पत्र्याच्या शेडमधील ट्रंकेत कुलूपबंद करून ठेवलेला तो गोळा याचं नीट वर्णन करणं भाग पडलं.

''काय म्हणता, त्या दोघा अनोळखी माणसांकडे असा गोळा आहे? बहुधा ते अंबरग्रीस असावं... ते खूप म्हणजे खूपच महाग असतं. त्याचीच तस्करी करत असावेत ते दोघे. आता झोपा तुम्ही उद्या आपण सावंतवाडीला जाऊ. सरकारी अधिकाऱ्यांना भेटून सगळं सांगू. ते करतील चौकशी... झोपा आता.''

(क्रमशः)

**संपर्क : ९४२३२९५३२९**

# AI आणि क्रिडाक्षेत्र

भाग ९

अच्युत गोडबोले

क्रिडाक्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी खेळाडूंना प्रचंड कष्ट घ्यावे लागतात. चांगला खेळाडू होण्यासाठी प्रचंड कष्टासोबत तज्ज्ञ प्रशिक्षकाकडून मिळणारे प्रशिक्षण तितकेच महत्त्वाचे असते. खेळताना आपल्या शरीराच्या होणाऱ्या हालचालींची दिशा, वेग, तसेच शरीरातल्या स्नायूंचा वापर योग्य प्रकारे होणे हे या प्रशिक्षणाचे एक उद्‌दिष्ट असते. गेल्या काही वर्षांत AI तंत्रज्ञानानं या क्षेत्रात प्रवेश केलाय आणि प्रशिक्षण एका वेगळ्या उंचीवर नेले आहे.

खेळाडूने खेळताना किंवा सराव करताना घालता येण्याजोगी (Wearable Devices) उपकरणे वापरली तर त्याच्याविषयी महत्त्वाचा डेटा आपल्याला मिळू शकतो. यात त्याच्या हालचालींशी संबंधित डेटा, स्नायूंच्या वापराशी संबंधित डेटा, त्याची मानसिक/भावनिक स्थिती अशा अनेक गोष्टी येतात. याच्यासोबत त्या खेळाडूची वैयक्तिक माहिती (वय, वजन, खेळण्याच्या शैलीची माहिती) आपण मिळवली आणि ही सगळी माहिती आपण AI सॉफ्टवेअरला दिली तर ते या माहितीमधून पॅटर्न्स शोधते. मग ते त्या खेळाडूसाठी वैयक्तिक असा प्रशिक्षणाचा प्लॅन तयार करते! इतकेच नाही तर खेळाडूची हालचालींची पद्धत पाहून, त्याच्या शरीराची इतर माहिती लक्षात घेत AI सॉफ्टवेअर त्याला भविष्यात काय इजा होऊ शकेल याविषयीही भाकीत करते !

सांघिक खेळांमध्ये सामना खेळण्याआधी आपल्या टीमची जमेची बाजू, दुर्बलता तसेच विरोधी संघाची जमेची बाजू, दुर्बलता यासारख्या गोष्टींचा विचार करून खेळाची रणनीती बनवावी लागते. यासोबत आपल्या, तसेच विरोधी टीममधल्या प्रत्येक खेळाडूचे गुणदोष,



प्रत्येकाची खेळण्याची शैली, मैदानाची स्थिती या गोष्टीही खेळण्याची रणनीती बनवताना लक्षात घ्याव्या लागतात. हे काम AI करू शकते. कोणत्या रणनीती वापरून जिंकण्याची शक्यता वाढू शकते याचा निर्णय AI देऊ शकते.

अमेरिकेतल्या नॅशनल बास्केटबॉल असोसिएशनने AI चे महत्त्व ओळखून खेळात सुधारणा करण्यासाठी सेकंड स्पेक्ट्रम नावाच्या कंपनीशी करार केला. नॅशनल बास्केटबॉल असोसिएशनमध्ये स्पर्धेमध्ये जेतेपदासाठी लढणाऱ्या तीस बास्केटबॉलच्या टीम्स आहेत. यातल्या प्रत्येक सामन्यात खेळाडूंच्या हालचालींवर बारीक नजर ठेवून माहिती मिळवण्याचे काम सेकंड स्पेक्ट्रम करते. एखाद्या सामन्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग पाहूनही सेकंड स्पेक्ट्रम 'कॉंप्युटर व्हिजन'चा वापर करत हालचालींची माहिती मिळवते. या साऱ्या माहितीतून AI तंत्रज्ञानाच्या सहाय्याने खेळाडूंच्या खेळण्याच्या पद्धतीतले पॅटर्न्स मिळवले जातात. मग प्रत्येक खेळाडूला खेळात सुधारणा करण्यासाठी काही सूचना दिल्या जातात.

प्लेयरमेकर नावाच्या कंपनीने फुटबॉल खेळणाऱ्यांसाठी एक प्रॉडक्ट बनवलाय. फुटबॉल खेळताना हा प्रॉडक्ट पायांना बांधायचा असतो. त्यामध्ये वेगवेगळे सेंसर्स असतात. खेळ चालू असताना ते पायांच्या हालचाली, वेग यासारखी माहिती मिळवतात. या माहितीवर AI तंत्रज्ञान काम करते आणि फुटबॉल खेळण्यात काय सुधारणा करता येतील याविषयी सूचना देते. हौशी फुटबॉलपटूंपासून ते व्यावसायिक खेळाडूंपर्यंत अनेक जण हा प्रॉडक्ट वापरताना दिसतात.

खेळाडूंसाठी अजून एक महत्त्वाची असणारी गोष्ट म्हणजे डाएट. सामान्य लोकांच्या आहारापेक्षा खेळाडूंचे आहार वेगळा असावा लागतो. खेळाडूंचे वय, वजन, खेळण्याशी संबंधित माहिती आणि दिवसभराचा दिनक्रम यांचा अभ्यास करून खेळाडूंसाठी आहार सांगणारी AI तंत्रज्ञानावर आधारित ॲप्लिकेशन्सही आजकाल वापरात आहेत. अर्थातच हे आहार नियोजन प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे वेगवेगळे असते.

नवीन खेळाडूंची निवड करताना कमी वेळेत अचूक अंदाज करण्याची गरज असते. एखाद्या खेळाडूच्या कौशल्याविषयी पटकन अंदाज बांधणे अवघड असते. या ठिकाणीही AI तंत्रज्ञानाची मदत होते. नव्या खेळाडूचा खेळ थोडा वेळ पाहून AI तंत्रज्ञानावर




आधारित सॉफ्टवेअर त्याच्या हालचालींवरून त्याच्याविषयी अंदाज व्यक्त करू शकते. त्यामुळे नव्या खेळाडूंची निवड करतानाही AI तंत्रज्ञान उपयोगी पडते.

आपण गुगलवर क्रिकेटच्या मॅचचा स्कोअर पाहण्यासाठी सर्च करतो, तेव्हा गुगल प्रत्येक टीमची जिंकण्याची किती शक्यता आहे ते सांगतो. अशा प्रकारच्या शक्यता AI तंत्रज्ञानाच्या सहाय्यानेच सांगता येतात. यासाठी गुगलला बऱ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो. यामध्ये सामन्यांमधली दोन्ही टीम्सची आतापर्यंतची कामगिरी, अलीकडच्या काळातली दोन्ही टीम्सचा खेळ यांसारख्या गोष्टी त्याला लक्षात घ्याव्या लागतात.

मोठे सामने पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने प्रेक्षक येत असतात. सामना सुरू होण्यापूर्वी काही वेळ ते तिकीट दाखवून स्टेडियममध्ये प्रवेश करतात. या वेळी प्रत्येकाचे तिकिट पाहून प्रवेश देणे वेळखाऊ असते. आजच्या जमान्यात AI तंत्रज्ञान इथेही मदत करताना दिसतं. 'फेस रिकग्निशन सिस्टीम' वापरत प्रेक्षकांचे चेहरे कॅमेऱ्यानं टिपत, त्यांचे चेहरे ओळखून त्यांना स्टेडियममध्ये प्रवेश देणारे AI सॉफ्टवेअर्स सध्या काही ठिकाणी वापरली जात आहेत.

येणाऱ्या काळात क्रिडाक्षेत्रात ठिकठिकाणी AI चा प्रवेश होताना दिसेल यात शंकाच नाही !

(क्रमशः)

**संपर्क :** achyut.godbole@gmail.com

बालभारती

# अभिजात मराठी

मराठी भाषा विभाग
भाषा जनाची | भाषा मनाची

**मराठी अभिजात भाषा झाली, आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी ‘बालभारती’ आणि महाराष्ट्र शासनाचा ‘मराठी भाषा विभाग’ मिळून ‘अभिजात मराठी’ हा उपक्रम राबवत आहे. पुढील विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.**

## चला भाषेच्या रुचकर स्वयंपाक घरात

प्रवीण दवणे

आपल्या सुंदर मराठी भाषेतही एक शब्दांचे स्वयंपाक घर आहे बरं का! थोडे आश्चर्याने चमकलात ना? कधी आपल्या स्वयंपाकघरातील वाण सामान ठेवलेले फडताळ पाहिलेत का? काहींनी तर नक्कीच पाहिले असणार! कितीतरी डाळी, कडधान्ये, तेल आणि



तूप त्यात असते ना? गंमत म्हणजे भाषेच्या स्वयंपाकघरातही भरभरून डाळी आहेत. त्यावाचून आपले बोलणे खमंग होत नाही. खूप वेगवेगळ्या म्हणी, वाक्प्रचार यांवाचून ह्या भाषेची डाळ काही शिजत नाही. पहा, पहिलाच वाक्‌प्रचार डाळींवरून मिळाला. डाळ शिजणे हाच तो पौष्टिक वाक्‌प्रचार! म्हणजे, एखाद्या पुढे काही न चालणे. मग आता मराठी भाषेच्या नक्षीदार कपाटातील काही डाळी कुठले कुठले वाक्प्रचार नि म्हणी घेऊन येतात, चला पाहूया! असे मूग गिळून बसू नका. अरे व्वा! मिळाली दुसरी डाळ! नि आली की वाक्प्रचार घेऊन. मूग गिळून बसणे म्हणजे काहीतरी सांगावेसे वाटत आहे, पण न बोलता चतुराईने गप्पच राहायचे आहे. तेव्हा आपण म्हणतो, हा मूग गिळून बसला आहे. काही जण अगदी मनात काय आहे, ते दुसऱ्याला कळूच देत नाहीत, मग आपण म्हणतो हा काही ताकास तूर लागू देत नाही. पहा, तूर हीसुद्‌धा डाळच! पण ती दुसऱ्याच्या हाती देऊन पळाले की आपण म्हणतो, चकवून पसार झाला बरं का! उदाहरणार्थ चोरांनी पोलिसांच्या हातावर तुरी दिली. तुरीप्रमाणे चवळी ही स्वतःचे वैशिष्ट्य घेऊन येते. तसेच ते वाटाणे या शब्दाचं पहा... लग्नात अनेकदा अक्षता असतात तांदळाच्या! पण आपल्या मराठीत वाटाण्याच्या अक्षता दिल्या की अर्थ बदलतो. वाटाण्याच्या अक्षता देणे म्हणजे गोड बोलून, काही काम न करताच एखाद्याला परत पाठवणे. उदाहरणार्थ ''मी माझे पैसे घ्यायला त्याच्याकडे गेलो पण त्याने मला वाटाण्याच्या अक्षता दाखवल्या.'' आहे की नाही मजा भाषेची!

आता जरा फडताळातील वेगळे डबे उघडूया. अरे, ही काय? खसखस! धम्माल! वर्गात केव्हातरी विनोद होतो नि चक्क कुठल्याही शेतीशिवाय ही पिकते. बरोबर! खसखस पिकणे म्हणजे श्रोतृ समुदाय खदखदून हसणे. आपण म्हणतो, सभेत अचानक खसखस पिकली. अरे वा, पुढील खणात जवळच तेलाची बरणी दिसते. हे तेल स्वयंपाक रुचकर करतेच, पण भाषेलाही फोडणी देते बरं का! आता नुसती फोडणी बसणे ह्यात ही गंमत आहे. वरणाला फोडणी बसली तर वरण चवदार, पण खिशाला फोडणी बसली की अनपेक्षित खर्च होऊन दिवसाची चव जाण्याची भीती! हेच फोडणीचे तेल जागा बदलताच सारा अर्थ बदलतो. वड्याचे तेल वांग्यावर गेले की एकाचा राग दुसऱ्यावर काढला असे होते. आपण म्हणतो ना कधी मित्राला, ''ए, वड्याचे तेल वांग्यावर नको काढूस'' तेल हे भाषेत कसे येत वेगळा अर्थ देते पहा, सैनिक डोळ्यांत तेल घालून देशाच्या सीमेचे रक्षण करतात. म्हणजे करडा पहारा ठेवणे. असा डोळ्यांत तेल घालून मनापासून अभ्यास करू लागलो की आपण भाषा छान पद्‌धतीने बोलू लागतो, मग, वर्गातल्या मराठीच्या बाई म्हणतात, ही काय 'तैलबुद्‌धीची' आहे. बघा इथे अर्थ कुशाग्र! बुद्‌धिमान! तेल तुपाबरोबर निघून गेले की अर्थ अगदी वेगळा होतो. तेलही गेले, तूपही गेले! म्हणजे हाती काही उरले नाही.जे होते तेही गेले.

तुम्ही आपापसांत हे सर्व पदार्थ नि त्याचे वेगळे अर्थ शोधणारा खेळ खेळून मजेमजेत शब्दसंग्रह तर वाढवालच, पण भाषा जाणून घेण्यातील आनंददेखील घ्याल.

आता आज आपण कोणकोणते नवे वाक्प्रचार आणि म्हणी या उताऱ्यातून वेचल्या ते आपल्या जागरूक पालकांना आणि शिक्षकांना उत्साहाने दाखवा.

सोबत एक मजेशीर कविता, काही पदार्थयुक्त म्हणी नि वाक्प्रचार यांचा वापर करून खास तुमच्यासाठी केलेली....

**भाषेच्या ह्या स्वयंपाकघरात शिजतंय काय?**
**मूग गिळून, कोणी तेथे**
**बसलंय काय?**
**हातावरती तुरी देऊन**
**कोण गेलं?**
**वाटाण्याच्या अक्षतांनी का**
**लगीन झालं?**
**खसखशीचे पीक येता**
**देऊ टाळी!**
**आनंदाच्या शेताचे रे**
**होऊ माळी!**

(क्रमशः)

**संपर्क :** ९८२०३८९४१४

# शब्दांच्या खाणाखुणा

डॉ. नीलिमा गुंडी

‘‘आई, या गोष्टीत बघ काय लिहिलंय! मला हे एस एस कलिंगड आण!’ मध्येच इंग्लिश अक्षरं चुकून आली आहेत का? केदारच्या प्रश्नामुळे गोंधळात पडून आईने त्याच्या हातातले पुस्तक घेतले नि म्हणाली, ‘‘अरे, ते एस, एस नाही. ते ‘ऽ ऽ’ म्हणजे एक चिन्ह आहे. त्याला अवग्रह म्हणतात. तुला ‘विरामचिन्हं’ शिकवायची आहेत वाटतं अजून! तुला सगळी विरामचिन्हं शिकवली की या भाषेतल्या खाणाखुणा किती महत्त्वाच्या आहेत ते कळेल बरं! अरे, या चिन्हाचा म्हणजे खुणेचा अर्थ असा आहे की, इथे उच्चार लांबवायचा आहे भाषेतले हेल त्यातून कळतात. तू दोन हातांची खूण करून मोठ्ठं कलिंगड दाखवताना ‘हे ऽ ऽ’ असंच म्हणतोस. ते लिहायची ही पद्धत तुला अजून माहीत नव्हती. कळलं?’’

केदारला भाषेत शब्दांच्या खाणाखुणा असतात, ही गोष्ट मोठीच गमतीची वाटली. तो आणि मन्या दोघं गॅलरीतून एकमेकांना खाणाखुणा करतात. तशीच शब्दांचीही रीत असते. तो मनात असा विचार करत असतानाच किमया आईकडे आपले लेखन दाखवायला आली. आई तिचे लेखन पाहून खो खो हसू लागली. आई म्हणाली, ‘‘किमया, ही तुझी माशी मावशी कोण?’’ किमया म्हणाली, ‘‘अगं, मी गोष्ट लिहितेय! आजोळी गेलेल्या मुलांची नि ती मुले



आजीला ‘मा’ असं म्हणत असतात.’’ ‘‘वा! म्हणून तू काय गंमत केली आहेस, ते तुला कळतंय का? काय लिहिलं आहेस हे?’’ ‘‘आम्ही मुले माकडे गेलो. तिथे माशी मावशीशी गप्पा मारल्या.’’ यावर केदारच काय, किमयाही हसू लागली. मात्र आपलं काय चुकलं, ते किमयाला कळत नव्हते.

आई म्हणाली, ‘‘तुम्हां मुलांना अजून भाषेतली विरामचिन्हं ही कुठे, कशी, का वापरायची ते माहीत नाही. किमया माकडे आणि माशी हा काय प्रकार आहे?’’ यावर किमया खजील होऊन म्हणाली, ‘‘अगं, मी नमिताकडे गेले होते ना, तिथं ती आईला ‘आई’ आणि आजीला ‘मा’ असं म्हणत होती. ते वेगळं वाटलं म्हणून मी वापरलं.’’ ‘‘अगं वापरायला काहीच हरकत नाही. फक्त इथे हे जे दोन शब्द तयार झाले, ते टाळायला हवे होतेस. अशा वेळी मा हा एक स्वतंत्र शब्द आहे. हे तू एकेरी अवतरण वापरून म्हणजे ‘मा’ कडे, ‘मा’ शी असं लिहून लक्षात आणून द्यायला हवं. या खुणेनंतर वाचनात आपोआप एखादा क्षण विराम येतो, त्यामुळे माकडे नि माशी असं होणार नाही. कळलं की नाही?’’ किमयाला छानच वाटलं ते ऐकून!

‘‘काकू, परवा शाळेत एका मुलानं ‘मला बुटकी राजकन्या हवी आहे.’ असं वाक्य लिहिलं होतं. वाचन काय करावे?’ हे लिहिताना बाई त्याला म्हणाल्या होत्या. अरे, पुस्तकाचं नाव आहे ना ते! ते नाव ‘बुटकी राजकन्या’ असं हवं. पुस्तकाचे नाव एकेरी अवतरणचिन्हात लिहायचं असतं.’’ त्यांनी लिहूनच दाखवलं फळ्यावर! मंदारने पुस्ती जोडली. मंदार हा केदारचा त्याच्यापेक्षा थोडा वयाने मोठा असलेला मित्र नेमका हजर होता, ह्या गप्पा चालू असताना!

मंदार म्हणाला, ‘‘काकू, भाषेतसुद्‌धा गणितासारखे कंस असतात ना?’’ आता केदार नि किमया फारच कान टवकारून ऐकू लागले. आई म्हणाली, ‘‘अगदी बरोबर! अगदी चौकोनी कंस आणि गोल कंस असे प्रकारही असतात.’’ ‘‘आई, आम्हांला स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम वगैरे मुख्य मुख्य चिन्ह माहीत आहेत. पण ही नाही माहीत!’’ किमया म्हणाली, तिला समजावण्यासाठी आईने एक वाक्यच लिहून दाखवले. ते असे; ‘‘उद्या सर्वांनी दुपारी ४ वाजता आमच्या शाळेत, आम्ही मुले (मी, मन्या, विन्या, गोट्या) भाग घेणार असलेल्या नाटकाला जरूर या!’’ म्हणजे जास्त स्पष्टीकरण द्यायचे असेल, तर असे दोन्ही कंस एकदम वापरता येतात. एरव्ही गोल कंस वापरतात. उदाहरण देते हं लिहून! ‘‘सहलीसाठी प्रत्येकाने वर्गणी रुपये ५०/–




(पन्नास) भरावी. आता कळलं?’’ आईनं विचारलं मग तीच म्हणाली, ‘‘मी एक वाक्य घालते. ते एकही विरामचिन्ह न देता लिहा म्हणजे कसा अर्थ कळत नाही; हे तुम्हांला कळेल! घ्या वाक्य–

‘‘मी येणार तर पण अरे मी जाणार लवकर हं चालेल का?’’

मुलं लिहितानाच हसू लागली! केदारने ‘तर पण’ चे ‘तर्पण’ करून टाकले होते. एकालाही नंतर त्या वाक्यात नीट विराम चिन्हे देता आली नाहीत. शेवटी आईनेच वाक्य नीट लिहून दाखवले. ते वाक्य असे होते.

‘‘मी येणार तर! पण अरे, मी जाणार लवकर हं! चालेल का?’’

‘‘अगं आई, नाटकाच्या संवादात दोन टिंब असतात. ती विसर्गाची चिन्ह असतात का गं?’’ केदारने हसून झाल्यावर विचारले ‘‘नाही रे! त्या चिन्हांना द्विबिंदू चिन्ह म्हणतात व्याकरणात! नाटकात त्याचा अर्थ होतो असा ‘रामः अरे लक्ष्मणा, तू कुठे आहेस?’ म्हणजे राम म्हणाला, अरे लक्ष्मणा, तू कुठे आहेस. कळलं?’’

‘‘त्या चिन्हानंतर काही माहितीही एरवी दिली जाते. आता बघ, तुला समजा, चार सुगंधी फुलांची नावे सांगायची असतील तर तू असं लिहू शकतोस.

सुगंधी फुलेः गुलाब, जाई, जुई, चाफा

ते चिन्ह विसर्गाइतकं अक्षराच्या जवळ द्यायचं नाही. बरं का!’’ मुलांना हे ऐकताना फारच मजा वाटू लागली. तेवढ्यात मंदारने फळ्यावर एक वाक्य लिहिले. ते असे होते.

‘‘काकू, तुम्ही आम्हांला अगदी छान शिकवता हो! उद्या पण येऊ का मी?’’ आणि मग हसून म्हणाला, ‘‘काकू, विरामचिन्हं बरोबर दिली आहेत ना?’’ यावर आई म्हणाली, ‘‘आता गप्पांना खरोखर विराम देऊ या!’’

(क्रमशः)

**संपर्क : ०२०–२४४८६०१५**

प्रा. विश्वास वसेकर
संपर्क : ९९२२५२२६६८



## घागर

घडा. पाणी आणण्याचे एक साधन. ही लहान गळ्याची असते. घागर; लोखंड, तांबे, पितळ यांच्या पत्र्यापासून बनवलेली असते. त्याचबरोबर मातीपासूनही घागर बनवली जाते. ग्रामीण भागांत दैनंदिन जीवनात पिण्यासाठीचे पाणी आणण्यासाठी आणि साठवून ठेवण्यासाठी घागरीचा वापर करतात. महत्त्वाच्या छोट्या रोपाला, वेलींना पाणी घालण्यासाठीही घागरीचा उपयोग होतो. मातीच्या घागरीचा वापर ठिबक सिंचनासारखाही केला जातो.

## आवल

मातीत चूल बनवताना मुख्य चुलीच्या बाजूला आणखी एक चुलीएवढा कट्टा केला जातो. मुख्य चुलीमधला जाळ या शेजारच्या चुलीत वा कट्ट्यातून येतो. त्यामुळे आवलावर ठेवलेले दूध वा इतर अन्न मुख्य चुलीतल्या जाळामुळे आपोआप शिजतात किंवा गरम राहतात. वेळ आणि इंधनाच्या बचतीची ही सुंदर कल्पकता आहे.





## कुंपण

शेतातील पिकाचे संरक्षण करण्यासाठी बोरी, बाभळी, हेकळणी इत्यादींच्या फांद्याचे शेतीभोवती कूड घेणे. शेतीला पाऊळ घातलेली असल्यास त्यावर ह्या फांद्या ठेवून वाटा बंद करणे किंवा जमिनीवर विशिष्ट पद्धतीने फांद्या आडव्या ठेवून शेतीभोवती कडे घालणे म्हणजे कुंपण होय. कुंपणामुळे गुरांपासून वा इतर प्राण्यांपासून शेतातील पिकाचे संरक्षण होते. यास कुपाटी, कूप, काटे लावणे असेही म्हणतात.

## गोफण

आंबाड्याच्या, सूताच्या दोरीपासून बनवलेले दगड मारण्याचे एक साधन. दोरी वळून त्यापासून चार-पाच इंच लांब व दोन अडीच इंच रुंद साप्ती तयार केली जाते. ही मध्यभागी रुंद व दोन्ही बाजूंकडे निमुळती असते. याच्या दोन्ही बाजूला दोरी जोडलेली असते. शेतकरी आपल्या पिकावरील पाखरे हाकलण्यासाठी किंवा वानरासारख्या प्राण्यांना हाकलण्यासाठी गोफणीचा वापर करतात. चोरांना दगड मारण्यासाठीही गोफणीचा वापर करतात. गोफणीने मारलेला दगड बऱ्याच लांबपर्यंत जातो.



# प्रश्नमंजुषा

उदय कदम

**१. महाराष्ट्र सरकारने कोणते वर्ष 'राजभाषा वर्ष' म्हणून साजरे केले ?**

१. १९७६ २. १९७५
३. १९७९ ४. १९८०

**२. 'मराठी भाषा पंधरवडा' कोणत्या महिन्यात साजरा केला जातो ?**

१. जानेवारी २. फेब्रुवारी
३. मार्च ४. एप्रिल

**३. खालील म्हण पूर्ण करा.**
**भरवशाच्या म्हशीला ---------**

१. दूध २. रेडकू
३. टोणगा ४. वासरू

**४. खालीलपैकी योग्य शब्द ओळखा.**

१. कोट्याधीश २.कोट्यधीश
३. कोट्याधीष ४. कोट्याधिश

**५. मराठी भाषेची लिपी लिहिण्याची पद्धत कशी आहे?**

१. देवनागरी लिपी लिहिण्याची पद्धत डावीकडून उजवीकडे अशी आहे.
२. देवनागरी लिपी लिहिण्याची पद्धत वरून खाली अशी आहे.
३. देवनागरी लिपी लिहिण्याची पद्धत उजवीकडून डावीकडे अशी आहे.
४. देवनागरी लिपी लिहिण्याची पद्धत वर्तुळाकार आहे.

**६. 'बृहत्कथा' या मूळ ग्रंथाचे लेखक कोण होते?**

१. भास २. गुणाढ्य
३. पाणिनी ४. वात्स्यायन

**७. 'लीळाचरित्र' या ग्रंथाचे लेखन खालीलपैकी कोणी केले आहे ?**

१. कवी मुकुंदराज २. माहिमभट्ट
३. संत ज्ञानेश्वर ४. श्री चक्रधर स्वामी

**८. महाराष्ट्रातील पहिले पुस्तकाचे गाव कोणते आहे?**

१. वाई २. महाबळेश्वर
३. सातारा ४. भिलार

**९. नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी। असे खालीलपैकी कोणी म्हटले आहे?**

१. संत तुकाराम २. संत ज्ञानेश्वर
३. संत एकनाथ ४. संत नामदेव

**१०. 'कथासरित्सागर' या ग्रंथाचे लेखक कोण आहेत?**

१. बाणभट्ट २. कालिदास
३. सोमदेव भट्ट ४. भास

संपर्क : ९७६७३१३८४३

**प्रश्नमंजुषा ऑगस्ट २०२५ ची उत्तरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ – १ | २ – ४ | ३ – ३ | ४ – २ | ५ – २ |
| ६ – ३ | ७ – २ | ८ – ३ | ९ – २ | १० – २ |

# चंद्रावरील स्वारीची तयारी

करिश्मा इनामदार
अनुवाद : डॉ.नितीन हांडे

माझ्या मराठी मित्रमैत्रिणींनो,

नमस्कार, मी करिश्मा इनामदार. मी भारतात, बारामतीमध्ये लहानाची मोठी झाले. इतर लहान मुलांप्रमाणेच मलाही रात्रीचे आकाश भुरळ घालायचे. तेव्हा मी ताऱ्यांना तासतास न्याहाळत असायचे. नक्षत्र, दूरचे ग्रह आणि आपल्या वातावरणाबाहेरील जगाबद्दल माझ्या मनात प्रचंड कुतूहल होते. इस्लाममध्ये रमजानचा महिना, आणि विशेषतः रमजान ईदच्या दिवशी मी आणि माझे कुटुंब चंद्र पाहण्यासाठी आमच्या छतावर जायचो. तेव्हा मी आईवडलांना नेहमी विचारायचे, ''क्या हम चांद पे जा सकते हैं?'' ''आपण चंद्रावर जाऊ शकतो का?''

मला तेव्हा याचे उत्तर माहीत नव्हते, मात्र रात्री चंद्र आणि तारे पाहताना माझ्या नकळत एक स्वप्न माझ्या मनात रुजू लागले होते. ते स्वप्न होते अंतराळाचे स्वप्न.. मी वाढत होते आणि माझ्यासोबत हे स्वप्न देखील एक दिवशी सकाळी मी जागे होत असताना, मला स्पेस शटल कोलंबिया आपत्तीची बातमी कानावर पडली. कल्पना चावला हे



नावदेखील तेव्हा मी पहिल्यांदाच ऐकले. ताऱ्यांपर्यंत पोहोचलेली एक भारतीय महिला अंतराळवीर! तिच्या दुःखद मृत्यूने मला खूप दुःख झाले, पण तिने जो वारसा आपल्यामागे सोडला होता, त्यापासून मला खूप प्रेरणा मिळाली. मला भविष्यात नेमके काय बनायचे आहे हे मला तेव्हाच समजले कळले.

मी माझ्या या स्वप्नाबद्दल कायम मित्रांसोबत, शिक्षकांशी, पालकांशी, ऐकणाऱ्या प्रत्येकाशी मी बोलत असे. मी नेहमी अवकाशाबद्दलच बोलत असे. माझ्या पालकांना मी याबाबत किती गंभीर आहे हे दिसले आणि त्यांनी मला मनापासून पाठिंबा दिला. त्यांनी मला अवकाश विषयाची पुस्तके विकत घेतली, मला अनेक विज्ञान व्याख्यानांना नेले आणि तारे पाहण्याच्या कार्यक्रमांमध्ये माझ्यासोबत सामीलदेखील झाले. जेव्हा इतर पालक त्यांच्या मुलामुलींसाठी सुरक्षित करिअर निवडण्याचा आग्रह धरत होते. त्या वेळेस माझे पालक माझ्या कुतूहलाला खतपाणी घालत होते.

मी जसजशी मोठी होत गेले आणि अधिक शिकत गेले, तेव्हा मी विज्ञानाच्या अधिक प्रेमात पडले कारण आजवर मला पडलेले अंतराळविषयक प्रश्न, पृथ्वीच्या सीमांच्या पलीकडे जाताना वाटणारी आव्हाने आणि शक्यता या सर्वांची उत्तरे मिळू लागली होती. चवदार तळ्यासाठी प्रसिद्ध असलेल्या महाड शहरामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठामधून मी इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशनमध्ये पदवी मिळवली. नंतर फ्रान्समध्ये अंतराळ विज्ञान विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर कॅलिफोर्नियामध्ये मी अंतराळ क्षेत्रात अशा रोबोटवर काम केले, जे आपल्यापासून लक्षावधी किलोमीटर अंतरावर जाऊन त्यांना सोपवलेले काम करतील. पर्वतावर चढणारे, पाणबुडीप्रमाणे पाण्यातून पलीकडे जाणारे हे रोबोट्स एक दिवस युरोपा नावाच्या गुरूच्या बर्फाळ उपग्रहाची मोहीम पूर्ण करतील. मागील काही दिवसांत मी संगणकीय दृष्टी या विषयावर काम करते आहे, जिथे उपग्रह आणि अवकाशयाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून, समोर दिसत असलेल्या दृश्याचे आकलन करतील आणि त्यानुसार स्वतःचे स्वतः पुढील निर्णय घेतील. हे काम करत असताना मज्जा तर येत होती खरी, मात्र मला अंतराळवीर व्हायचे होते.. लहानाची मोठी होत जात असताना मी त्याच लहान मुलीचा प्रश्न माझ्यासोबत घेऊन जात होते: 'क्या हम चांद पे जा सकते हैं?' या स्वप्नाचा ध्यास घेऊन मी मानवी अंतराळ उड्डाणाच्या क्षेत्रात काम करत राहिले आणि अलीकडेच, मला नासाच्या जॉन्सन स्पेस सेंटरसोबत ॲनालॉग मिशनवर काम करण्याची सुवर्णसंधी मिळाली.

**मोहिमेचे तपशील :**

नासाचे जॉन्सन स्पेस सेंटर (जेएससी) हे अंतराळवीरांना प्रशिक्षण देणारे महत्त्वाचे केंद्र आहे. इथे अंतराळवीरांची सुरक्षितता या विषयावर संशोधन केले जाते. अवकाशात उपग्रह पाठवणे सोपे असते, मात्र जेव्हा यानात एखादी व्यक्ती पाठवायची असते तेव्हा खूप काळजी घेतली जाते. तिच्या जीवनाची आणि सुरक्षिततेची किंमत अनमोल असते. जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये पृथ्वीवरच अंतराळातील परिस्थिती कृत्रिमरीत्या निर्माण केलेली आहे. या अंतराळ सदृश परिस्थितीमध्ये अंतराळवीरांच्या शारीरिक आणि मानसिक अवस्थेचा अभ्यास अतिशय तज्ज्ञ मंडळींकडून केला जातो. याला ॲनालॉग स्पेस मिशन म्हणतात आणि त्या मोहिमांमध्ये सहभागी असलेल्या लोकांना ॲनालॉग क्रू किंवा ॲनालॉग ॲस्ट्रोनॉट म्हणतात.

एक्सप्लोरेशन ॲटमॉस्फीअर सिस्टीममधील प्रिब्रेथ प्रोटोकॉलचे परिक्षण आणि प्रमाणीकरण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. प्रिब्रेथ प्रोटोकॉल म्हणजे काय? सोप्या भाषेत सांगायचे तर स्पेसक्राफ्ट केबिनमध्ये असताना आणि अंतराळात स्पेसवॉक करत असताना अंतराळवीरांना ज्या वातावरण बदलाचा सामना करावा लागतो, त्याचा अभ्यास मला ॲनालॉग ॲस्ट्रोनॉट म्हणून करायचा आहे. एक्स्ट्राव्हेहीक्युलर ॲक्टिव्हिटीज (EVAs) अर्थात यानाच्या बाहेर जाऊन करावयाच्या क्रियांमध्ये स्पेस सूटचे प्रेशर नियंत्रित ठेवणे, ऑक्सिजनचे योग्य प्रमाण राखून डिकंप्रेशन सिकनेस कमी करणे याची जबाबदारी माझ्यावर असेल. अंतराळवीरांची सुरक्षा आणि मोहिमेची कार्यक्षमता यांसाठी हे अतिशय महत्त्वाचे असते.

ॲटमॉस्फीअर सिस्टीममधील प्रिब्रेथ प्रोटोकॉलचा अभ्यास करण्यासाठी जेएससीमधील वीस फूट व्यास असलेल्या एका तीन मजली कॅप्सूलमध्ये माझ्यासह आठ अंतराळवीरांना एका आठवड्यासाठी पाठवले. हवेचा दाब कमी असलेल्या या कॅप्सूलमध्ये चंद्रावर स्पेसवॉक करताना घ्यावयाच्या काळजीचा अभ्यास



केला गेला.

फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या इए–५ (EA-5) ॲनालॉग मिशनसाठी माझी निवड झाली. हा माझ्यासाठी एक अद्‌भुत अनुभव होता! मिशन टीमने अशा उमेदवारांची निवड केली, ज्यांचे शरीर अंतराळवीर होण्यासाठी आवश्यक असलेल्या शारीरिक निकषांची पूर्तता करत होते. या मोहिमेसाठी निवड होण्यापूर्वी मला आणि इतर उमेदवारांना वैद्यकीय तपासणी सोबतच अनेक मानसिक आणि शारीरिक चाचण्यांना सामोरे जावे लागले.

निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण सुरू झाले. जेएससीमधील EA टीमने मोहीम आणि प्रशिक्षणाचे काटेकोरपणे नियोजन केले होते. मी आणि माझ्यासोबत निवड झालेल्या उमेदवारांनी सुरुवातीला जेएससीच्या न्यूट्रल ब्युयन्सी लॅबोरेटरीमध्ये (एनबीएल) चेंबर फ्लाइट्ससोबत भरपूर सराव केला. या चेंबर फ्लाइट्समध्ये आम्हांला आमच्या स्वतःच्या हायपोक्सिया आजाराची लक्षणे म्हणजे शरीरातील ऑक्सिजनची पातळी कमी होण्याची लक्षणे ओळखण्यास खूप महत्त्वाची मदत झाली.

जेएससी मधल्या २० फूट कॅप्सूलमध्ये मोहिमेचे आयोजित करण्यात आले होते. स्वप्नवत सोनेरी इतिहास असलेली ही कॅप्सूल, कारण इथेच अपोलो आणि स्कायलॅब अंतराळवीरांनी प्रशिक्षण घेतले होते. त्यांनी त्या मोहिमेदरम्यान परिधान केलेले पॉलीबेंझिमिडाझोल (पीबीआय) कपडेदेखील स्कायलॅब युगाची साक्ष देत तिथे आजही सुस्थितीत आहेत. अशा ऐतिहासिक प्रयोगशाळेत भविष्यातील चंद्रमोहिमांसाठीत प्रिब्रेथिंग प्रोटोकॉलच्या विकासात माझे योगदान असणे, चंद्राचे अंतरंग उलगडणाऱ्या

भविष्यातील अंतराळ मोहिमांशी मी जोडले जाणे ही माझ्यासाठी खूपच अभिमानाची बाब आहे.

कॅप्सूलमधील सर्व वस्तू, आमच्या कपड्यांसह सर्व काही, अग्निरोधक होते. इए (EA) टीमकडून मला आपुलकीची आणि जिव्हाळ्याची वागणूक मिळाली. पोशाखासारख्या गोष्टींचादेखील त्यांनी विचार केला. माझ्या धार्मिक आणि सांस्कृतिक बाबींचा सहनभूतीपूर्वक विचार केला. मला जर पीबीआय मटेरियलपासून बनवलेला हिजाब मिळाला तर खूप बरे होईल असे मी बोलले, आणि मला तो हिजाब मिळाला देखील! आश्चर्याची गोष्ट म्हणजे, पीबीआय हिजाब हादेखील माझ्या इतर कॉटन हिजाबप्रमाणेच आरामदायी होता. हा हिजाब डोक्याला गुंडाळताना मला खूप गौरवास्पद वाटत होते. त्यांनी मला दोन हिजाब बनवले असल्याने, मी एक ईव्हीएसाठी घालायचे आणि दुसरे मी नियमित वापरासाठी कॅप्सूलमध्ये ठेवायचे. मी कदाचित पहिली महिला असेल जिच्यासाठी नासाने पीबीआय मटेरियलपासून कस्टम हिजाब बनवला आहे. मी मुख्य अन्वेषक आणि संपूर्ण इए (EA) टीमच्या विचारशीलतेबद्दल मनापासून आभारी आहे.




युनायटेड स्टेट्सच्या विविध भागांमधून आलेल्या विविध क्रू सदस्यांना भेटणे आणि त्यांच्यासोबत काम करणे हा एक संस्मरणीय अनुभव होता. प्रत्येक सदस्य हा खास होता, प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळा रंग होता, तो त्याच्या व्यावसायिक क्षेत्रात अद्वितीय होताच, पण प्रत्येकजण काही खास छंद बाळगून होता. प्रत्येकाच्या रक्तात कुतूहल, जाणून घेण्याची भूक शब्दशः भिनली होती.. कॅप्सूलमध्ये तुमच्या डोळ्यांना केवळ चकचकीत राखाडी रंग नजरेस पडत असतो, ज्यामुळे दिवसाचे १६ तास आम्ही कामात व्यग्र असलो तरी असे वाटायचे की वेळ जाता जात नाहीये. काळ जणू थांबला आहे.

स्वयंसेवकांची आमची पूर्ण टीम एकमेकांना मदत करण्यास अतिशय तत्पर होती, टीममध्ये खेळीमेळीचे वातावरण असल्याने काम खूप सोपे आणि मजेशीर होत होते. दिवसभर आम्ही एकमेकांच्या प्रायव्हसीचा आदर करायचो, कुणी कुणाच्या कामात लुडबुड करत नव्हतो. मात्र रात्री जेव्हा आम्ही जेवणासाठी एकत्र येत होतो, तेव्हा खूप धमाल असायची, गप्पांचा फड जमायचा. जेव्हा तुम्ही आणि मोजके लोक ठरावीक काळासाठी कोणत्या जागी एकत्र अडकलेले असता, तेव्हा तुमचे मनमिळावू व्यक्तिमत्त्व खूप फायद्याचे ठरते. टीमवर्क करताना प्रत्येकाने एकमेकांशी संघर्ष करण्यापेक्षा आपापल्या कामावर लक्ष केंद्रित करणे अतिशय महत्त्वाचे असते. आमच्या मोहिमेत मानसिक बदलापेक्षा शारीरिक बदलांवर अधिक लक्ष केंद्रित केले होते. तरीही आमच्या टीममध्ये एकमेकांविरुद्ध विसंवाद कुठेच नव्हता. आता या सर्व टीम मेंबर्ससोबत माझे जन्मभराचे नाते जडले आहे.

मोहीम संपल्यानंतर आमच्या टीमने एक कार्यक्रम केला. जेएससीमध्ये पृथ्वीच्या वातावरणात परत येण्याचा स्वागत समारंभ म्हणजेच हवेच्या सामान्य दाबामध्ये परत येण्याचा कौतुक सोहळा आयोजित केला. या मोहिमेत भाग घेणे आणि अंतराळ उड्डाणात मानवी शरीरावर नक्की काय परिणाम घडतात हे जवळून पाहणे हा एक संस्मरणीय अनुभव होता.

मोहिमेमध्ये सहभाग घेऊन तिचे वेगवेगळे रोमांचक पैलू तर मला अभ्यासायला मिळालेच, त्याशिवाय जेएससी ज्या शहरात आहे, त्या ह्यूस्टनमधील स्थानिक संस्कृतीचा अनुभव घेण्याचीही संधी मला मिळाली. या परिसरात अनेक सुंदर रेस्टॉरंट्स आहेत. यांपैकी बहुतेक ठिकाणच्या भिंती अंतराळवीरांच्या थीमने रंगवल्या आहेत. या ठिकाणी कधीही गेलात तरी तुम्हांला अनेक अंतराळवीर धमाल करताना दिसतात.

स्थानिक लोकांकडून अंतराळवीर आणि त्यांच्या कुटुंबीयांबद्दलच्या ऐकलेल्या कथा मी कधीच विसरू शकणार नाही. गंमत म्हणजे इथे एकमेकांचा आदर करण्याचा प्रकार दोन्ही बाजूंनी आहे. इथला समाज तर

अंतराळवीरांचा मनापासून आदर करतोच, शिवाय अंतराळवीरदेखील त्यांना मिळणाऱ्या सभोवतालच्या लोकांच्या पाठिंब्याची आणि सेवांची कदर करतात.

या मोहिमेसाठी जेएससीमध्ये आले असताना मला अनेक अंतराळवीरांना भेटण्याची संधी मिळाली. जेव्हा तुम्ही तुमच्या आवडत्या नायकांच्या जवळ असता तेव्हा तुमचा उत्साह तर द्विगुणित होतोच, परंतु त्याच वेळी एक जबाबदारी पार पाडायची असते. त्यांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर अतिक्रमण न करणे आणि त्यांच्या अंतराळ उड्डाणांबद्दलच्या आपल्या अगणित बालिश शंका एकदम विचारून त्यांना भंडावून न सोडणे गरजेचे असते. त्यांना त्यांची कामे असतात, एकतर ते त्यांच्या स्वतःच्या मोहिमेची तयारी करत असतात किंवा अंतराळवीरांच्या पुढील तुकडीला प्रशिक्षण देत असतात. म्हणून याबाबत मी मनाशी एक खूणगाठ बांधून ठेवली. त्यांच्याशी गप्पा मारायचा प्रसंग आला तरी स्वतःवर संयम ठेवायचा आणि त्यांच्याशी शक्यतो, हवापाणी, सार्वजनिक वाहतूक यांसारख्या विषयांची चर्चा करायची.

इए-५ (EA 5 / EVI-5) या ॲनालॉग मोहिमेत सहभागी होणे यासारखा अनुभव आयुष्यात एकदाच येत असतो. या मोहिमेत माझ्या अंतराळयानाच्या प्रक्षेपणाविषयक, या ब्रह्मांडातील इतर ठिकाणची जीवसृष्टी शोधणे बाबतची जाणीव आणि समज अधिक गहिरी झाली. अंतराळ उड्डाण ऑपरेशन्स आणि पृथ्वीपासून दूर लक्षावधी किमी अंतरावर ज्या मोहिमा काढल्या जातात, त्यांची तयारी किती कठोर असते हे इथे प्रत्यक्ष पाहायला मिळाले. माझे शरीर हायपोक्सियाला कसे प्रतिसाद देते हे शिकायला मिळाले. अफलातून टीम सोबत घालवलेल्या प्रत्येक क्षणाने अंतराळ संशोधनासाठी माझी असलेली आवड आणखी वाढत गेली. या मोहिमेत फक्त संशोधन अभिप्रेत नव्हते तर तुमचे टीमवर्क, तुम्ही परिस्थितीशी कसे जुळवून घेता आणि तुमच्या सहनशक्तीच्या सीमा काय आहेत हे सर्व या मोहिमेत पारखले गेले. भविष्यातील चंद्र आणि त्यापुढील खोल अंतराळात काढण्यात येणाऱ्या मोहिमांसाठी शास्त्रज्ञ नियमावली (Protocol) सुधारत असताना, अंतराळ प्रवासाचे भविष्य घडवण्यात मीदेखील एक छोटी भूमिका बजावली याचा मला अभिमान आहे.

मी कॅप्सूलमधून बाहेर पडले आणि टीमने वाजवलेल्या टाळ्यांचा आवाज माझ्या कानी पडला तेव्हा माझ्या मनात भावनांची लाट उसळली. आम्ही मोहीम पूर्ण केली होती आणि माझे एक स्वप्न पूर्ण झाल्यासारखे वाटत होते. माझ्या सभोवताली असलेल्या लोकांचे हसरे, आनंद आणि अभिमानाने भरलेले चेहरे सांगत होते की आपली मोहीम यशस्वी पूर्ण झाली आहे. त्या वेळी मला भारतातील त्या लहान मुलीची आठवण आली, जिने एकदा चंद्राकडे पाहून विचारले होते की मी कधीतरी तिथे जाऊ शकेन का? आता अनेक वर्षांनंतर, ती मुलगी चंद्रमोहिमा शक्य करण्यात आपले योगदान देत आहे. आता ही मोहीम संपली असली तरी, भविष्यातील मानवी अंतराळ उड्डाण क्षेत्रामधील माझ्या योगदानाची ही फक्त सुरुवात असेल.

अमेरिकेमध्ये संशोधक आणि शास्त्रज्ञांना त्यांच्या क्षेत्रात अधिक भरीव कामगिरी करण्यासाठी आणि मानवाच्या क्षमतांचे क्षितिज विस्तारण्यासाठी खरोखरच निकोप वातावरण तयार करण्यात आले आहे, त्यामुळे इथे मी अनेक आश्चर्यकारक गोष्टी करत आहे. त्यासोबतच मी भारतीय विद्यार्थ्यांना, इथल्या अनेक संधींची माहिती देण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. भारतीय विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी आणि त्यांना नवनवीन तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक क्षेत्रांची ओळख करून देण्यासाठी मी 'द नेक्स्ट स्पेस जनरेशन' नावाचे एक व्यासपीठ तयार केले आहे. माझा असा विश्वास आहे की विज्ञान हे सर्वसमावेशक आणि प्रेरणादायी तर असलेच पाहिजे पण त्याशिवाय ते सर्वसामान्यांच्या आवाक्यात देखील असले पाहिजे. वैज्ञानिक क्षेत्रातील, विशेषतः अंतराळ विज्ञानातील समस्यांवर काम करण्यासाठी तुम्ही महाविद्यालयीन शिक्षण किंवा पदवी पूर्ण होईपर्यंत वाट पाहिली पाहिजे असे काही नाही. तुम्ही आतापासूनच सुरुवात करू शकता. रोव्हर डिझाइन करणे असो, उपग्रह सिम्युलेशन कोड करणे असो किंवा विश्वाबद्दल अतिशय गंभीर प्रश्न विचारणे असो, तुमच्या मनातील कुतूहल हीच तुमची सर्वात मोठी शक्ती असेल. जर तुम्ही कधी ताऱ्यांकडे पाहताना विचार केला असेल की तिथे काय असेल, तुम्हांला तिथे जाता येईल का.. तर या लेखातून मी तुम्हांला सांगू इच्छिते.. तुम्ही नक्कीच जाऊ शकता.. अशक्य असे काही नाही.. तुम्हांला कितीही अडचणी आल्या तरी तुम्ही तुमचे स्वप्न साकार करू शकता!

**संपर्क** : **thenextspacegeneration@gmail.com**
**अधिक माहितीकरिता** : **www.thenextspacegeneration.com**

# एका अंतराळवीराचे शुभ आगमन

लीना बोकील
अनुवाद : स्वप्नाली अमृतकर



मित्रांनो स्वप्न तर सगळेच बघतात, आपण स्वप्नांत आकाशात,अंतराळात जातो. मात्र झोपेतच स्वप्न विसरतो.पण स्वप्नांना जगता आले पाहिजे. सत्यात उतरवता आले पाहिजे.जसे आपल्या भारतातले अंतराळवीर शुभांशू शुक्ला अंतराळात जाऊन पुन्हा पृथ्वीवर आले अगदी तसेच.उत्तर प्रदेशातील लखनऊमध्ये शुंभाशू शुक्ला यांचा जन्म १० ऑक्टोबर १९८५ झाला. त्यांचे वडील शंभू दयाळ शुक्ला हे निवृत्त सरकारी अधिकारी आहेत.त्यांची आई आशा शुक्ला या गृहिणी आहे. शुभांशू हे तीन भावंडांमध्ये सर्वात लहान आहेत. लखनऊच्या अलीगंज येथील सिटी मॉन्टेसरी स्कूलमध्ये त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केले. शिक्षण घेत असतानाच १९९९ मध्ये झालेल्या कारगिल युद्धामुळे ते प्रचंड प्रभावित व प्रेरित झाले होते.त्यांच्या आयुष्यातील हा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा होता.

त्या वेळी त्यांनी राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) आणि नौदल अकादमी प्रवेश परीक्षा दिली आणि ते उत्तीर्णही झाले.२००५ मध्ये त्यांनी पुण्यातील प्रतिष्ठित एनडीएमधून संगणक शास्त्रात विज्ञान शाखेची (बीएससी) ही पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांची भारतीय हवाई दल (आयएएफ) अकादमीमध्ये उड्डाण प्रशिक्षणासाठी निवड झाली. जून २००६ मध्ये त्यांना आयएएफच्या फायटर स्ट्रीममध्ये फ्लाइंग ऑफिसर म्हणून नियुक्त करण्यात आले. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे भारतीय हवाई दलाचे एक लढाऊ व्यक्ती व चाचणी वैमानिक (पायलट), अभियंता आणि इस्रोमधील अंतराळयात्री आहेत. त्यांना सुखोई एसयू-३०एमकेआय, मिग-२१, मिग-२९, जग्वार, बीएई हॉक, डोर्नियर २२८ आणि अँटोनोव्ह एन-३२ इत्यादी विविध प्रकारच्या जटिल विमानांच्या २००० तासांपेक्षा जास्त उड्डाणाचा अनुभव आहे. शुक्ला यांचे टोपणनाव शक्स (SHUX) असे आहे.

२०१९ मध्ये, शुक्ला यांना इस्रोच्या भारतीय मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रमासाठी इन्स्टिट्यूट ऑफ एरोस्पेस मेडिसिनने (IAM) निवडले होते. इस्रोने अंतराळवीर प्रशिक्षणासाठी निवडलेल्या चार उमेदवारांपैकी ते एक आहेत.तसेच २०२० मध्ये त्यांना रशियातील मॉस्को येथील युरी गागारिन कॉस्मोनॉट प्रशिक्षण केंद्रात मूलभूत प्रशिक्षणासाठी पाठवण्यात आले होते. जे त्यांनी २०२१ मध्ये पूर्ण केले. नंतर त्यांनी बेंगळुरू येथील इस्रोच्या अंतराळवीर प्रशिक्षण केंद्रामध्ये विशिष्ट प्रशिक्षण घेतले आणि भारतीय विज्ञान संस्थेतून एरोस्पेस अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर पदवी पूर्ण केली. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी, इस्रोने पुढील काही वर्षांत होणाऱ्या भारताच्या पहिल्या मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेसाठी शुक्ला यांना अधिकृतपणे विशेष (Elite) उत्तम अंतराळवीर संघाचा सदस्य म्हणून ओळख करून दिली.

२५ जून २०२५ रोजी भारतीय हवाई दलाचे वैमानिक (Pilot) शुभांशू शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (ISS) ॲक्सिओम-४ मोहिमेचे पायलट म्हणून उड्डाण करून इतिहास रचला. फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटर येथून शुक्ला आणि इतर तीन अंतराळवीरांना स्पेस एक्स फाल्कन रॉकेटमध्ये घेऊन जाणारी ही मोहीम सुरू करण्यात आली. हे अभियान यशस्वीरित्या प्रक्षेपित झाले. दि.२६ जून २०२५ रोजी ते आयएसएसमध्ये पोहोचले. प्रक्षेपणानंतर सुमारे २८ तासांनी शुक्ला आयएसएसमध्ये दाखल झाले. आयएसएसमध्ये प्रवेश केल्यानंतर काही मिनिटांतच ॲक्स-४ अभ्यागत दलासाठी (crew) औपचारिक स्वागत समारंभ झाला. यात दरम्यान व्हिटसनने शुक्ला यांना अवकाशात पोहोचणारा ६३४ वा व्यक्ती म्हणून अंतराळवीर पिन दिला! या मिशनमध्ये शुक्ला पायलट असल्याने डॉकिंग, अनडॉकिंग आणि री-एंट्री इत्यादी जटिल आणि महत्त्वपूर्ण कामे पार पाडण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती.

ॲक्सिओम-४ मिशन हे व्यावसायिकरित्या आयोजित केलेला एक उपक्रम आहे. जिथे शक्स आणि त्यांच्या इतर ३ क्रू-सहकाऱ्यांनी आयएसएसवर दोन आठवड्यांहून अधिक काळ घालवला. तेथे एकूण सुमारे ६० प्रयोग केले. ज्यामध्ये किमान सात प्रयोग इस्रोचे होते. या मोहिमेदरम्यान त्यांनी भारतीय नेतृत्वाखाली सूक्ष्म गुरुत्वाकर्षण, बियाणे, शैवाल आणि मानवी शरीरक्रियाविज्ञान यावर सात प्रयोग केले. शक्सने आयएसएसवर केलेल्या प्रयोगांपैकी एक मेथी आणि मूग डाळीच्या अंकुरांवर होता. अवकाशात सूक्ष्म किंवा शून्य गुरूत्वाकर्षणाखाली सिंचन व्यवस्थेतून पीक टिकवणे हे अभ्यासले गेले. अवकाशात स्नायूंचे नुकसान,मेंदूच्या क्षमतेवर डिजिटल स्क्रीन-टाइमचा तसेच मधुमेही रुग्णांवर इन्सुलिनचा होणारा परिणाम या बाबींचा अभ्यासही येथे करण्यात आला. शक्स त्याच्यासोबत टार्डिग्रेड किंवा 'वॉटर बेअर' घेऊन गेले होते. हा एक सूक्ष्म प्राणी आहे जो पृथ्वीवर अत्यंत तीव्र हवामान परिस्थितीत सुमारे ५०० दशलक्ष वर्षांपासून टिकून आहे. त्यांनी असे प्राणी अवकाशात देखील टिकू शकतात का हे पाहिले. त्याचबरोबर अवकाश परिस्थितीत सायनोबॅक्टेरियाची वाढ आणि पोषक वापर तपासला (जे पृथ्वीवरील पहिले ऑक्सिजन उत्पादक मानले

जातात). सूक्ष्म-शैवालची वाढ,चयापचय आणि अनुवांशिक क्रियाकलापांचा देखील अभ्यास केला. जो दीर्घकाळाच्या अवकाश मोहिमांसाठी ऑक्सिजन, अन्न आणि जैवइंधनाचा स्रोत असू शकतो.

विविध भारतीय संस्था आणि विद्यापीठांनी डिझाइन केलेले हे सर्व प्रयोग २ ते ३ वर्षांनी होणाऱ्या गगनयान मोहिमेसह भारताच्या भविष्यातील मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रमांसाठी मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करतील अशी अपेक्षा आहे.ते अंतराळातील जीवनाच्या व्यापक आकलनास देखील हातभार लावतील. मनोरंजक गोष्ट म्हणजे शक्स भारतीय अन्न - जसे की भाताचे प्रकार आणि मिष्टान्न - मूगदाळ आणि गाजराचा हलवा, आमरस इत्यादी घेऊन गेले होते. भारतीय नागरिकाने आयएसएसला प्रवास करण्याची ही पहिलीच वेळ असल्याने मेनूमध्ये या भारतीय स्वादिष्ट पदार्थांचा व मध्यम मसालेदार अन्नाचा देखील समावेश होता! खरं तर, शक्स आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (ISS) वर असताना डीएफआरएलने त्यांच्यासाठी आहार (menu) आखून दिलेला होता. भारतीय संरक्षण, अन्न संशोधन प्रयोगशाळा (DFRL) ही एक संशोधन आणि विकास संस्था आहे. जी विशेषतः भारतीय सशस्त्र दलांसाठी अन्न विज्ञान आणि तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करते. भारताच्या संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (DRDO) अंतर्गत १९६१ मध्ये स्थापित, DFRL ही कर्नाटकातील म्हैसूर येथे आहे. लष्करासमोरील अन्न-संबंधित आव्हानांना तोंड देण्यासाठी विविध अन्न उत्पादने, तंत्रज्ञान आणि उपाय विकसित करणे व त्याचा पुरवठा करणे हे त्यांचे प्राथमिक ध्येय आहे. म्हणूनच, ते ISRO च्या आगामी मानवी अंतराळ उड्डाणासाठी, म्हणजेच गगनयान मोहिमेसाठी अन्न तयार करणार आहेत.

जेव्हा शक्स उर्फ शुभांशू शुक्ल आयएसएसवर पोहोचले तेव्हा त्यांनी अवकाशातून राष्ट्राला उद्देशून पहिला संदेश दिला तो पुढीलप्रमाणे

**नमस्कार, माझ्या प्रिय देशवासीयांनो!**

**काय सुंदर प्रवास! ४१ वर्षांनंतर आपण पुन्हा एकदा अंतराळात परतलो आहोत. ही एक अद्भूत सहल आहे. आपण पृथ्वीभोवती ७.५ किलोमीटर प्रति सेकंद वेगाने प्रदक्षिणा घालत आहोत. माझ्या खांद्यावर कोरलेला तिरंगा मला सांगतो की मी तुमच्या सर्वांसोबत आहे. माझा हा प्रवास आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाची सुरुवात नाही तर भारताच्या मानवी अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात आहे. तुम्ही सर्वांनी या प्रवासाचा भाग व्हावे अशी माझी इच्छा आहे. तुमची छातीही अभिमानाने फुलली पाहिजे... एकत्रितपणे, भारताच्या मानवी अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात करूया. जय हिंद! जय भारत!**

त्यानंतर आपल्या भारताच्या राष्ट्रपती - माननीय द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान माननीय श्री नरेंद्र मोदी जी आणि भारतीय हवाई दलाने शुभांशू शुक्ला यांचे AX-4 मोहिमेबद्दल अभिनंदन केले. ISS वर असताना शक्स यांनी सार्वजनिक कार्यक्रमातही भाग घेतला होता. ज्यामध्ये २८ जून रोजी पंतप्रधान मोदींसोबत थेट व्हिडिओ-कॉन्फरन्सिंग आणि ४ जुलै आणि ८ जुलै २०२५ रोजी शालेय विद्यार्थ्यांशी हॅम-रेडिओ संभाषण यांचा समावेश होता. अंतराळवीर शुक्ला यांनी इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या संभाषणातही भाग घेतला. ज्यांनी भारताच्या गगनयान मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रमाला पुढे नेण्यासाठी त्यांच्या प्रयोगांचे आणि उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. ही मोहीम भारताच्या अंतराळ कार्यक्रमासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. ज्यामध्ये शुक्ला अंतराळात जाणारे दुसरे भारतीय आणि ISS ला भेट देणारे पहिले व्यक्ती ठरले. मोहिमेच्या जवळजवळ शेवटी, शक्सने हे प्रसिद्ध शब्द म्हटले, जे भारतासाठी ऐतिहासिकच ठरतील! ते म्हणाले - पृथ्वी पूर्णपणे एक दिसते; बाहेरून कोणतीही सीमा दिसत नाही.

**अंतराळवीराचे शुभआगमन -**

१५ जुलै २०२५ रोजी ॲक्सिओम मिशन ४ (ॲक्स-४) शुभांशू शुक्ला आणि इतर तीन क्रू सदस्य कॅलिफोर्नियातील सॅन दिएगोच्या किनाऱ्याजवळ पॅसिफिक महासागरात यशस्वीरित्या खाली उतरले. हा स्प्लॅशडाऊन भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी ३.०२ वाजता झाला. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील १८ दिवसांसह त्यांच्या एकूण २० दिवसांच्या मोहिमेचा समारोप झाला. १५ जुलै २०२५ ला त्यांचे पृथ्वीवर शुभ आगमन झाले. ते क्रू ग्रेस नावाच्या स्पेसएक्स ड्रॅगन कॅप्सूलमध्ये परतले.

**लेखिकेबद्दल:** अंतराळ विज्ञान शिक्षक म्हणून लीना बोकिल यांनी अनेक अध्यापन कार्ये केले असून त्या विज्ञान आणि तंत्रज्ञान संवादक म्हणून ओळखल्या जातात. भारतातील लहान शहरे आणि खेड्यांमध्ये अंतराळ प्रयोगशाळा स्थापन करण्याची त्यांची योजना आहे.

**संपर्क :** ९८८१४०७५६८

# विचारांची जादू

स्नेहल बाकरे

''आई, ए आई कुठे आहेस तू ?'' आज मुकुलची शाळेतून आल्या आल्याच कुरकुर सुरू असते.

''मुकुल, मी आत स्वयंपाक घरात आहे. तुझ्यासाठी खायला करतीये.'' आई गरमागरम पुरी तळत मुकुलला म्हणाली. टम्म फुगलेल्या पुरीला पाहतात मुकुलच्या नाकावरचा राग जरा कमी होतो. हातपाय तोंड धुऊन, कपडे बदलून मुकुल ताटावर तर बसतो पण आज जेवणाकडे त्याच लक्षच नसतं. नक्कीच काहीतरी बिनसलंय हे आईच्या लगेचच लक्षात येतं.

''सांग पाहू काय झालं होतं मगाशी ? का बरं बोलवत होतास मला. शाळेत काही झालंय का की रिक्षात कोणाशी भांडण वगैरे.. ?''

''रिक्षात कोणी माझ्याशी भांडत नाही. पण शाळेत आमच्या अनघा मॅडम मला उगाच कारण नसताना ओरडल्या.''

''बापरे, अनघा मॅडम तर तुझ्या आवडीच्या. त्या तुला ओरडल्या म्हणजे नेमकं काय झालं ?''

''तुला तर माहितीये, मी काल रात्री जागून माझा प्रोजेक्ट पूर्ण केला. वर्गात सगळ्यांपेक्षा माझाच प्रोजेक्ट एकदम भारी झाला होता. मॅडमलाही तो खूप आवडला. आधी त्यांनी त्यासाठी माझं खूप कौतुक पण केलं. पण नेमकं त्याच वेळी माझ्या बाजूला बसणाऱ्या रोहितकडून पाणी पिताना त्यावर थोडंसं पाणी सांडलं. त्यामुळे त्याच्यावरचे रंग एकमेकांत मिक्स झाले आणि प्रोजेक्ट थोडा खराब झाला. मॅडम त्याला रागवल्या आणि मलाही. आता तूच सांग त्यानं पाणी सांडवलं तर यात माझी काय चूक ? तरीही आख्ख्या वर्गासमोर त्या मला



म्हणाल्या की, ''तुला तुझा प्रोजेक्ट बाजूला ठेवता आला नाही का? अभ्यासात एवढा हुशार आहेस, तर मग छोट्या छोट्या गोष्टीत साधी काळजीही घेता येत नाही तुला?''

आई त्याची समजूत काढत..., ''अरे मुकुल म्हणजे त्यांनी तुला पुढच्या वेळी सावध राहण्यासाठी असं सांगितलं असेल. त्यांनाही तुझा प्रोजेक्ट आवडला असेल आणि तो खराब झालेला पाहून त्यांना देखील वाईट वाटलं असेल. म्हणून तर असं म्हणाल्या असतील.''

''हो, पण म्हणून काय एवढ्या सगळ्यांसमोर रागवायचं का? त्यांच्यामुळे आज दिवसभर शाळेत मी कोणाशी बोललो पण नाही. माझ्या बेस्ट फ्रेंड राघवचा आज वाढदिवस होता. मी त्यालाही शुभेच्छा दिल्या नाही. आज मला डबाही खावासा वाटत नव्हता. कसाबसा अर्धा डबा संपवलाय. पीटीच्या तासाला पण मी वर्गात एकटाच बसून रडत होतो.''

''मुकुल, मॅडम बोलल्यामुळे तुला वाईट वाटणं साहजिक आहे. पण त्यामुळे एवढं नाराज होणं हे काही बरोबर नाही. आणि एखादी गोष्ट मनाला इतकी लावून नाही घ्यायची. नाहीतर त्याचा परिणाम बाकीच्या गोष्टींवरही होऊ शकतो.''

''पण त्यांनी मला ओरडलं म्हणूनच तर हे सगळं झालं ना. तसं काही झालंच नसतं तर माझा दिवस नेहमीसारखा आनंदातच गेला असता ना.''

''आपला दिवस कोणामुळे ही खराब किंवा चांगला होत नसतो. हे सगळं आपल्यावर असतं. आपण जर एखाद्या गोष्टीचा सतत वाईट विचार करत राहिलो. तर मग आपली सगळी शक्ती त्यातच खर्च होते. मग आपल्याकडून चांगली कामंदेखील होत नाहीत.''

''ते कसं काय...?'' मुकुलला आई काय सांगतीये हे नीट समजलं नव्हतं.

आई दोन रिकामे पेले त्याच्यासमोर घेऊन आली. ''हे बघ हे पेले म्हणजे आपलं मन आहे असं समज. आणि आता यात मी थोडं पाणी भरते. हे पाणी म्हणजे आपले विचार बरं का! आता या एका पेल्यात मी निवडलेल्या कोथिंबीरच्या काड्या म्हणजे कचरा घालते. ह्या काड्या म्हणजेच वाईट विचार असं समज. आता तूच सांग हे पाणी तू पिऊ शकशील का?''

मुकुलने अगदी त्वरित उत्तर दिले, ''नाही! हे पाणी तर खराब आहे, हे कसं काय पिणार?''

''आता या दुसऱ्या पेल्यात मी लिंबाचा रस, साखर आणि किंचितसं मीठ घालते हे म्हणजे चांगले विचार असं समज आता तूच सांग बघू... हे चविष्ट सरबत प्यायला कोणाला आवडणार नाही ते.''

मुकुलला लिंबू सरबत खूपच आवडत असल्यामुळे त्याने एका दमात गटागटा ते संपवले.

''सरबत प्यायल्यावर कसं छान फ्रेश वाटतंय की नाही.''

''हो तर, आता खूप मस्त वाटतं.''

''बघ... चांगल्या विचारांची हीच तर जादू असते. आपण मनात सतत वाईट विचारांना धरून बसलो तर आपलं संपूर्ण मन ह्या काड्या घातलेल्या पाण्यासारखं गढूळ होतं. जसं हे गढूळ पाणी पिऊन आपली तहान भागू शकत नाही. तसंच जर आपण कोणाशी तरी झालेलं भांडण, कोणाचातरी ओरडा अशा वाईट गोष्टी मनात साठवून ठेवल्या तर आपलं मन उत्साही राहणार नाही आणि मग आपल्याकडून पुढची साधी साधी काम देखील होणार नाहीत. जसं आज दिवसभर तू मॅडम रागावल्या एवढीच गोष्ट मनात धरून बसलास आणि म्हणूनच राघवला वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला विसरलास, डबापण नीट खाल्ला नाहीस.''

''पण तेच जर का तू मॅडमने आधी तुझं जे कौतुक केलं, ही चांगली गोष्ट मनात ठेवली असतीस आणि त्यांचा ओरडा हा फक्त तुझ्या चांगल्यासाठीच होता ही गोष्ट लक्षात घेतली असतीस तर तुला त्याचं एवढं वाईट वाटलं नसतं. लिंबू सरबत प्यायल्यावर जसं तुला उत्साही वाटलं तसंच जर चांगले विचार मनात ठेवले असते तर नेहमीप्रमाणे आजचाही दिवस आनंदात गेला असता.

आईने दिलेलं पेल्याचे उदाहरण मुकुलला चांगलंच पटतं.

''ठीक आहे आई, मला माझी चूक कळली आता. मी इथून पुढे असंच करत जाईन. फक्त चांगल्या गोष्टींवरच माझं लक्ष केंद्रित करत जाईन.''

**संपर्क : ९३७२९११५१५**

# कुतूहल

वसुंधरा भोपळे

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' ऑगस्ट २०२५ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ सप्टेंबर २०२५ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

संपर्क : ७३८७४३२९४१

**१) दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा 'मराठवाडा मुक्तीदिन' खालीलपैकी कोणत्या घटनेशी संबंधित आहे?**
१) इंग्रजांपासून स्वातंत्र्य
२) निजामाच्या अमलातून मुक्तता
३) भारत-पाक युद्ध
४) पाणी बचत

**२) 'ऑक्सिऑम-४' या नासाच्या अंतराळ मोहिमेअंतर्गत अंतराळात झेपावणारा भारतीय गगनवीर कोण आहे?**
१) रमेश कश्यप २) रमण भल्ला
३) शुभांशू शुक्ला ४) संदीप शर्मा

**३) दरवर्षी २८ सप्टेंबर रोजी साजरा केला जात असणारा 'कर्णबधीर दिन' कोणत्या प्रकारच्या तंत्रज्ञानाचा उपयोग कर्णबधीर व्यक्तींसाठी वाढवावा लागेल?**
१) ब्रेल लिपी
२) व्हीलचेअर
३) सांकेतिक भाषेसाठी ॲप्स व श्रवण यंत्रे
४) केवळ मोबाइल

**४) 'जागतिक शांतता दिन' साजरा करण्यामागचा प्रमुख उद्देश कोणता आहे?**
१) युद्धासाठी लोकांना तयार करणे.
२) शांतता राखण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता वाढवणे.
३) देशांतर्गत राजकारण वाढवणे.
४) आर्थिक व्यवहार वाढवणे.

**५) जागतिक पर्यटन दिनाच्या निमित्ताने कशास प्रोत्साहन दिले जाते?**
१) घरात राहून सामाजिक माध्यमांवरील पर्यटन रील पाहणे.
२) परदेशी चलन जमा करणे.
३) नव्या ठिकाणांचा शोध घेणे आणि संस्कृती जाणून घेणे.
४) जंगलतोड करणे.

**६) 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' सारखी भव्य शिल्पे घडवणारे पद्मविभूषण पुरस्कार विजेते ------ यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार २०२५, घोषित करण्यात आला आहे.**
१) रघुनाथ माशेलकर २) राम सुतार
३) भालबा केळकर ४) विजय तेंडुलकर

**७) कर्मवीर भाऊराव पाटील यांचा 'रयत शिक्षण संस्था' स्थापन करण्यामागचा मुख्य उद्देश काय होता?**
१) मुलांसाठी खेळाचे मैदान उभारणे.
२) गरीब व ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देणे.
३) मूल्यशिक्षण देणे.
४) हसत खेळत शिक्षण देणे.

**८) ओझोन थर कोणत्या गोष्टीपासून आपले संरक्षण करतो?**
१) ध्वनी प्रदूषण
२) सौर किरणांचे अतिनील विकिरण
३) धूळ
४) पाऊस

**९) 'डॉ. एम. विश्वेश्वरय्या' यांची जयंती १५ सप्टेंबर रोजी असते. त्यांनी कोणत्या क्षेत्रात योगदान दिले आहे?**
१) शिक्षण २) वैद्यकीय
३) अभियांत्रिकी ४) कृषी

**१०) दक्षिण कोरियामधील ॲथलेटिक्स स्पर्धेत ३००० मीटर स्टिपलचेस प्रकारात सुवर्णपदक मिळवणारा भारतीय धावपटू कोण आहे?**
१) नीरज चोप्रा २) अविनाश साबळे
३) मुरली श्रीशंकर ४) अंजुम मोदगिल

**११) भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी ‘शिक्षक दिन’ कोणाच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो?**
१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
२) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन
३) महात्मा गांधी
४) स्वामी विवेकानंद

**१२) जागतिक नारळ दिवस दरवर्षी ‘२ सप्टेंबर रोजी’ साजरा केला जातो. नारळ उत्पादनात भारताचा कोणता भाग अग्रेसर आहे?**
१) राजस्थान    २) केरळ
३) पंजाब    ४) उत्तर प्रदेश

**१३) २०२५ मध्ये RAW (Research and Analysis Wing) या भारतीय गुप्तचर संस्थेच्या प्रमुखपदी कोणाची नियुक्ती झाली?**
१) सामंत गोयल    २) अजित डोवाल
३) पराग जैन    ४) अरविंद कुमार

**१४) २०२५ सालचा साहित्य अकादमी ‘बाल वाङ्मय पुरस्कार’ कोणाला प्रदान करण्यात आला?**
१) व. पु. काळे    २) श्री. पु. भागवत
३) डॉ. सुरेश सावंत    ४) सुधा मूर्ती

**१५) अरण्यऋषी म्हणून ओळखले जाणारे मराठी लेखक कोण?**
१) पु. ल. देशपांडे    २) व. पु. काळे
३) मारुती चित्तमपल्ली    ४) ग.दि. माडगूळकर

---

## ऑगस्ट २०२५ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (ऑगस्ट २०२५) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) –१ | २) –३ | ३) –३ | ४) –४ | ५) –२ |
| ६) –३ | ७) –४ | ८) –२ | ९) –२ | १०) –३ |
| ११) –३ | १२) –२ | १३) –२ | १४) –२ | १५) –३ |

## कुतूहल (जुलै २०२५) यशस्वी स्पर्धक

**परभणी –** कु. शर्वरी चांडक
**कोल्हापूर –** कु. आराध्या भाकरे, कु. अनुष्का पाटील, कु. आराध्या दिंडे, कु. आरोही भाकरे, कु.भक्ती भाकरे, कु. गौतमी कांबळे, कु.गौतमी कांबळे, कु. पायल पोवार
**सातारा –** कु. सुवीर फडे
**छत्रपती संभाजीनगर –** कु. वेदिका गमे
**पुणे –** कु. मनस्वी चौधरी
**सांगली –** कु. श्रीवर्धन कुंभार

## चित्रकोडे (जुलै) यशस्वी स्पर्धक

**रायगड –** कु. सुजल फराट, कु. माही पाटील
**अहिल्यानगर –** कु. इशान जोंधळे, कु. ओवी गायके, कु.श्लोक आमले, कु. पार्थ वाणी, कु. गौरी घरत, कु. अप्रिता होन, कु. आरोही धस, कु. तनय जिंदगी
**पुणे –** कु. शरयू फडतरे, कु. स्वरा खरमाळे, स्वराज खरमाळे, कु. तनिष्का भालेराव, कु. तन्वी भालेराव, कु. मनस्वी चौधरी, कु. अर्णवसिंग राजपूत
**रत्नागिरी –** कु. आराध्या मांडवकर, कु. वेदिका दिवाळे, कु.जान्हवी गुरव, कु. सुदिक्षा राजये, कु. दुर्वा नामये, कु. विराज ठिक, कु. संभन कोलते, कु.लावण्या साळुंखे, कु. श्रेयश सोडये, कु. रुद्र गुरव, कु. अन्वेश जाधव, कु. साजिरी भुवड, कु.शरिफ जोगले, कु. तेजस भुवड, कु. सोहम भुवड, कु.अनिश भुवड, कु. सनिध्य भुवड,
**सातारा –** कु. हर्षवर्धन सोडमिसे, सुवीर फडे, कु. ध्रुव जगदाळे, कु. आर्यन जगदाळे, कु. शौर्य सरगडे, कु. श्रीयांश सावंत
**सांगली –** कु. श्रेयस प्रताप शेवडे, कु. श्रीवर्धन कुंभार, कु. श्रीवर्धन कुंभार, कु. शौर्य गुडीमणी,
**सिंधुदुर्ग –** कु. शिव’ तेली, कु. गौरी गोरूले, कु. कैलास सावंत, कु. शौर्य ठुकरूल, कु. आरोही राऊत, कु.अथर्व पवार, कु. प्रज्ञा आयरे, कु. गौरी दसुरे, कु. अनुराग गोरूले, कु. जिनत शेख, कु.पूर्वा घाडी, कु. रुद्राक्ष देवरुखकर, कु. गौरी आयरे, कु.हर्षाली घाडी, कु. मानवी राडये, कु. रिया साळस्कर, कु.गौरव गोरुले, कु. दिव्या गोरूले, कु. शुभ्रा राडये, कु. रामदास साळस्कर, कु.मेघना मेस्त्री, कु. गौरी गोरुले, कु. सानवी तळेकर, कु.स्वरूप परब, कु. अंश घाडी, कु. देवांश चव्हाण, कु. आनंद घाडी, कु. दुर्वा चव्हाण, कु.गौरांग साळस्कर, कु.नंदिनी धुरी, कु. चैताली धुरी, कु. विर्तिका शेर्लेकर, कु. साहिल नावळेकर, कु. फातिमा नावळेकर, कु. यासिन नावळेकर, कु. तनय लाड, कु. स्वरा तांबे, कु. पियुष तेली, कु. रिहा नावळेकर, कु. सालिहा नावळेकर, कु. प्रांजल नांदगावकर, कु. आरहान साटविलकर, कु. रिया बिडये, कु. फैजान नावळेकर, कु. आरहान पाटणकर, कु. माहिरा नावळेकर, कु. अलामश पाटणकर, कु. आहिल साटविलकर, कु. आसिमा साटविलकर, कु. अमीर साटविलकर, कु. तन्मय पाटील, कु. जान्हवी नानचे, कु. आरजू नावळेकर, कु. इशांत मोरये, कु.ओमकार मोरजकर, कु. लता धुरी, कु. वासंती धुरी
**परभणी –** कु. प्रचिती चांडक, कु. शर्वरी चांडक
**नागपूर –** कु. नीरजा कुलकर्णी
**कोल्हापूर –** कु. देविका पोवार, कु. तेजस्वी पाटील, कु.स्वप्नाली यादव, कु. वेदिका भाकरे, कु. स्वरा भाकरे, कु. शांभवी कुलकर्णी
**छत्रपती संभाजीनगर –** कु. सायली डोळस, कु. सानीका सोलसकर, कु.प्रतिक सुलाने, कु. शिवांजली परदेशी, कु. कांचन दिवटे, कु. वेदिका गमे
**बुलडाणा –** कु. सिद्धी तिरके
**नांदेड –** कु. अ.गफार फाजलाणी, कु.जैद शेख, कु.जिक्रा शेख

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



एकदा मी शाळेतून घरी जात होते तेव्हा एक आजी रस्त्यावर रडत बसल्या होत्या. मी त्यांना विचारले. काय झालं आजी.'' तेव्हा त्या आजी म्हणाल्या, ''मला दिसत नाही. बाळा, काही मुलं माझी हातातली काठी घेऊन गेली. आता तर मला चालणं मुश्किल झालं आहे.'' मी त्यांना म्हणाले, ''मी शोधेन तुमची काठी'' आणि त्यांची काठी मी शोधायला लागले. तेव्हा मला काही मुलं त्या आजीच्या काठीसोबत खेळताना दिसली. मी त्यांना म्हणाले, ''त्या आजीची काठी परत करा.'' त्यांनी माझे बोलणे टाळले. मी त्याच्याशी भांडण केले नाही. ती छोटी मुलं होती, मी त्यांना प्रेमानं समजावून सांगितले व त्यांनी काठी परत केली आणि त्या आजींना सॉरी म्हणाले. मी हे सर्व माझ्या आईला सांगितले. माझी आई खूश झाली.

**कु. श्रावणी संदीप पाटोळे**
वर्ग – सहावा, जि.प.केंद्र प्राथमिक शाळा गदाना,
ता. खुलताबाद, जि. संभाजीनगर



पावसाळा सुरू होणार असल्यामुळे मी व बाबा रेनकोट घेण्याकरिता माळेगावमध्ये दुकानात गेलो. त्या दुकानातून आम्ही पावसाळी कपडे घेतले. त्याबरोबर बाबांच्या मित्राने माझ्या हातात चार ते पाच पाकिटे रेनकोट मोफत दिले. माळेगावहून बारामतीच्या घरी येत असताना पाऊस चालू झाला. आम्ही लगेच मोटारसायकल रस्त्याच्या बाजूला असलेल्या पत्राशेड खाली थांबवली पाऊस कमी व्हायच नाव घेत नव्हता. आम्ही सोबत असलेले पावसाळी कपडे अंगावर घेतले. शेजारी लहान दोन मुले व त्यांचे आईबाबा पावसाने भिजल्यामुळे थंडीने कुडकुडत होती. मला त्यांचे वाईट वाटले व मी त्यांना माझे जवळील रेनकोटचे पाकीट दिले. मुलांचे आई–बाबा नको म्हणत होते परंतु मुलांना द्यावे असे वाटत होते. मी आग्रह करून त्या दोन मुलांच्या हातात रेनकोट दिले. मुले आनंदी झाली. पाऊस कमी झाल्यानंतर त्या दोन मुलांनी अंगामध्ये रेनकोट घातला व निघताना हसत खुशीने टाटा केला. नंतर बाबांनी माझे कौतुक करून राहिलेले दोन रेनकोटही गरजूंना दे म्हणून सुचवले. बाबांनी घरी आल्यावर आई व भाऊ वीर या दोघांना घडलेला प्रसंग खुशीत सांगितला व आईला भजी बनवण्यास सांगितले.

**कु. शंभुराज अमोल वाघ**
इयत्ता तिसरी, जि. प.प्राथमिक केंद्रशाळा, ढवाणवस्ती,
बारामती, मु.पो.सणसर, ता. इंदापुर, जि. पुणे ४१३१०४.



मी माझ्या घराच्या कंम्पाऊंडमध्ये खेळत होते. त्याच वेळेस साड्यांवर प्लास्टीक बादली, प्लास्टीक टब देणारी बाई आली. तिच्या कडेवर लहान मुलगा होता. कडक उन्हामुळे ती खूप थकली होती. मी तिला कंम्पाऊंडमध्ये बोलावले व बसायला सांगितले. तिच्यासाठी थंडगार पाणी व गरम पोळी भाजी आणून तिला खायला दिली. ते खाल्ल्यानंतर तिला खूप बरे वाटले. तिने मला आशीर्वाद दिला. हे सर्व माझी आई पाहत होती. तिने मला प्रेमाने जवळ घेतले व सांगितले की, अशीच सर्वांना मदत करावी व प्रत्येकाशी सहानुभूतीने वागावे. त्यामुळे मला खूप बरे वाटले.

**कु. तनुजा प्रशांत कोठारी**

इयत्ता- ७वी, अहिल्यादेवी कन्या विद्यालय, देवपुर, धुळे



मी सकाळी उठल्यावर, मी घरातून बाहेर आले. आणि बघितले, एक पक्षी दारात मरून पडला होता. मी त्याला पाणी पाजून पाहिले, तरीही तो पक्षी उठला नाही. मी एका मोकळ्या जागी खड्डा खणला आणि त्या पक्ष्याला मी त्या खड्ड्यात ठेवले आणि त्याच्यावर मीठ टाकले, फुले टाकली. मग मी त्याच्यावर माती टाकली. त्याला पुरताना मला खूप दुःख झालं. मी त्याच्यापाशी जाऊन बसले. नंतर मी उठून घरी गेले. आता मी दर उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी दररोज पाणी ठेवीन व इतरांनाही ठेवायला सांगेन.

**कु. पायल धनेश जाधव**

महात्मा फुले विद्यालय, खोडद,
मु. पो. खोडद, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०४.



मी शाळेतून घरी येताना दोन रुपयांचे फुगे घेतले. मी रस्त्याने येत असताना एक बाळ रडत होते. त्याची आई कुलूप लावत होती. मी फुगा फुगवला तेव्हा ते बाळ रडायचे थांबले. मी थोडं पुढे गेले. ते बाळ परत रडायला लागले. मग मला कळले की, त्याला फुगा हवा होता. मी फुगा फुगवला आणि त्याला दिला. एका फुगा त्याच्या भावाला दिला. त्या बाळाची आई माझ्याकडे बघून हसली. त्या बाळालाही खूप आनंद झाला. मी घरी आले. आईने विचारले की, उशीर का झाला. मी घडलेली घटना आईला सांगितली. आईने शाबासकी दिली आणि मला खूप आनंद झाला.

**कु. आरोही राजू साळे**

इयत्ता पाचवी, जि. प.प्राथमिक शाळा, मु. पो. हंगेवाडी,
ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर ४१४७०१.

# उमलती प्रतिभा

## जंगल

जंगलात असतात हिरवीगार झाडे
त्यांच्या आड खेळतात चिमुकली पिले
जंगलात असतात सुंदर फुले
त्यांना पाहताच मन कसे खुले
मध्येच असते छोटेसे तळे
त्यात एक कमळ डुले
जंगलात असतात छोटे छोटे पक्षी
त्यांच्या अंगावर सुंदर नक्षी
रान पानाफुलांनी भरून गेले
सर्व प्राण्यांचे घर होऊन गेले.

**कु. सेजल शंकर रायकर**
इयत्ता – ५ वी,
जि.प.प्राथमिक शाळा हंगेवाडी,
ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर ४१४७०१

## फूल

एक होतं फूल
ते असतं मूल

झाडच त्याची आई
तोडू नका त्याला

फुलू दे
उमलू दे

एक होतं फूल
ते असतं मूल

आईच्या जवळच खेळत असतं
हसत आणि खेळत असतं

**ईश्वरी कदम**
जिल्हा परिषद मुलींची शाळा,
चिंचणी नं.२, ता. तासगाव, जि. सांगली ४१६३१२.



कु. कल्याणी बाजीराव नाईक
जिल्हा परिषद प्राथ.शाळा हट्टी, ता.चांदवड, जि.नाशिक–४२३११७



कु. किया श्रेयकर
इयत्ता ९ वी, ज्ञान प्रबोधन मंदिर, बेळगाव–५९०००८

# नदी आणि मुलगी

नदी – अगं, तू इथे काय करतेस?

मुलगी – मी अशीच फिरत फिरत इकडे आले.

नदी – पण तुझं नाव काय?

मुलगी – माझे नाव सिमा, तुझे नाव काय?

नदी – माझे नाव कावेरी नदी आहे.

मुलगी – नदी, तू जिथे जिथे वाहत जाते तिथे वाहत जाताना तुला काय काय मिळते?

नदी – वाहत जाताना अनेक झाडे, पक्षी, प्राणी असे सगळे मला भेटतात.

मुलगी – तुला एवढं सगळं मिळतं, तुली किती छान वाटत असेल ना!

नदी – हो, पण मला एका गोष्टीचं खूप वाईट वाटतं.

मुलगी – कोणत्या गोष्टीचं?

नदी – तुम्ही लोक माझ्यात कचरा टाकता. मग मी प्रदूषित होते. मला घाण करतात. मी जिथे जिथे वाहत जाते. तिथे माझे पाणी प्यायला प्राणी व पक्षी येतात. ते प्रदूषित झालेले पाणी पितात. मग ते आजारी पडतात.

मुलगी – कावेरी नदी हे बघ, आता मी तुझ्यात कधीच कचरा टाकणार नाही. आज तुझं महत्त्व मला कळलं.

नदी – तुला तरी माझं महत्त्व कळलं. तू तुझ्या सर्व बांधवांना माझं महत्त्व पटवून सांग, जेणेकरून तुझं–माझं व सर्वांचं कल्याण होईल.

**खुशी चंद्रकांत धुरी**
इ. ६वी, जि.प. पूर्व प्राथमिक केंद्रशाळा,
शेर्ले नं.१ (देऊळवाडी), ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग–४१६५१४.



**कु. रजत मोहिते**
इ.७ वी(इ), अण्णासाहेब कल्याणी विद्यालय, ता.जि.सातारा–४१५००१



**कु. सोनम मंगेश गावडे**
जि.प. शाळा, सरमळे देऊळ, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग–४१६५११


जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
बंगल्याबाहेर नेहा व राजेश....
हा विनय बंगल्यात जाऊन बराच वेळ झाला, काय झालं असेल?
त्याला त्या गुंडांनी पकडलं तर नसेल ना...
थोड्याच वेळात..
तो बघ... तो त्या गॅलरीतून खाली येतोय.
फारच घाबरलेला दिसतोय... शूऽऽ विनय...
अरे, हा तिकडे कुठं चाललाय?
तितक्यात...
ते बघ... दोघे जण बाहेर आलेत.
हा तर तो गुंड आहे. पण त्याच्या सोबतचा कोण?


ते दोघे गाडीत बसलेत; पण हा विनय कुठाय?
गाडी बंगल्यातून बाहेर पडली.
मला वाटलंच त्या गुंडासोबतच ते जादूगार होते.
मलाही वाटतं, त्यांनी ड्रेस बदलल्यामुळे आपण त्यांना ओळखू शकलो नाही.
पण ते जादूगारांना घेऊन गेले तरी कुठे?
पण जादूगाराचे कुटुंब या बंगल्यातच आहे. आपण पोलिसांची मदत घ्यायला हवी.
हा विनय आपल्याला सोडून कुठे पळाला.
आता कुठे असेल तो?
विनय गाडीत मागच्या बाजूला लपून बसला होता.
क्रमशः

# अंगण ते आकाश

सतीश लोथे

अंगण आहे धुळीचे,
पहाटेला झाडायचे.
सडा घालण्या येई ताई
मोती थोडा दूर जाई.
आई प्रकटे दारातून
उमले रांगोळी हातातून.
बाबा घेई पाढे पाठ
ठेवायला सांगी मान ताठ.
घरात काकाला मोठा मान
ताईला म्हणे उदबत्ती आण.
दुपारची पंगत सुटीची रंगत
आजोबा देती खेळात संगत.
आम्ही ओसरीवर गातो गाणी
हसत नाचतो बालक कुणी.
कमानीत खुलला रंगांचा बहार
काकूच्या गळ्याला मोत्यांचा हार.
सांज झाली की पणतीचा प्रकाश
चंद्राची सफर, जांभळे आकाश.

संपर्क : ७८८७८६७५७४





# The Power of Imagination

Dr. Saurabh Jadhav

Magic isn't just in spells,
Or in the fairy tales one tells,
It's in the dreams we dare to see,
And in our boundless fantasy.

With just our minds, we can explore,
New lands, new worlds, and so much more,
Imagination sets us free,
To be whatever we wish to be.

But magic also lives in truth,
In learning through our days of youth,
In every fact and lesson learned,
In every page and corner turned.

Reality and dreams combine,
To shape a world that's truly fine,
Where what we know and what we dream,
Together form a brilliant gleam.

So keep the magic in your heart,
Both in the real and wondrous part,
For in this blend of truth and dreams,
The world is brighter than it seems.

Contact : 9657478844

# The Great Adventure

Umashankar Devadhe

In the bustling city of Pune, 12-year-old Aarav and his younger sister, Meera, were brimming with excitement. Their parents had promised them a special vacation—a road trip across India. The idea of exploring the vast landscapes, diverse cultures, and rich history of their country thrilled them beyond measure.

Their journey began with a train ride to Delhi, where they marvelled at the grandeur of the Red Fort and the serenity of the Lotus Temple. From there, they travelled to Rajasthan, where the golden sands of the Thar Desert stretched endlessly before them. They rode camels, visited ancient forts, and experienced the vibrant culture of the region.

The highlight of their adventure was a visit to the Himalayas. As they ascended the winding roads, the air grew cooler, and the landscape transformed into a lush green paradise. They reached a quaint village nestled in the mountains, where they stayed in a traditional wooden house. The villagers welcomed them with open arms, sharing stories of their ancestors and the legends of the mountains.

Aarav and Meera spent their days trekking through the hills, learning about the local flora and fauna, and helping the villagers with their daily chores. They discovered the importance of preserving nature and the simple joys of life away from the hustle and bustle of the city. They also realized that people have lost finding pleasures in the smallest things that





happen around them. One doesn't need to go to the glittering malls and multiplexes to find happiness. A small plant on a balcony can be a source of happiness. Travelling to offbeat places can teach you endurance and patience.

As their journey came to an end, Aarav reflected on the experiences and lessons they had gathered. He realized that travel was not just about visiting new places, but about understanding different cultures, respecting nature, and cherishing the bonds of family.

Their adventure had not only broadened their horizons but had also instilled in them a deep appreciation for the diverse tapestry that made up their incredible country. Without a doubt, it is always fascinating to visit other countries to know more about different cultures, but visiting your own country and exploring the places. Thus, the great adventure through Indian landscapes taught them many life lessons, which they couldn't have learned in any of their texts. This great adventure became the long -lasting memory for them.

**Contact : 9823541160**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Draw the other half of the bear with the help of the grid and colour it.**



**Unscramble the jumbled letters & place them correctly in the empty squares to form 7 different words.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| G | R | N | A | O | E | | | | | | |
| R | C | O | O | T | D | | | | | | |
| M | A | R | F | E | R | | | | | | |
| T | A | B | R | I | B | | | | | | |

# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.
२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ सप्टेंबर २०२५.
३) कोड्याचे उत्तर डिसेंबर २०२५ च्या अंकात प्रसिद्ध होईल.
४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal Regd.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.08.2025, Date of Posting - 27th & 28th August 2025 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)




















**कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा**

लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित ‘निवडक किशोर’चे १४ खंड







किंमत प्रत्येकी
₹ १६३ /-
(५०% सूट)







**वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-**

किशोर


**If not delivered please return to :**

संपादक, ‘किशोर’ मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
‘बालभारती’, सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० - २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,